सूचनांचे स्वागत

# अहमदनगर परिदृष्य २०२० पत्र

***कार्यकारी अहवाल***

आयोजन

**डॉ. संध्या एस. अय्यर**

सेंटर फॉर डेव्हलपमेन्ट स्टडीज

स्कूल ऑफ सोशल सायन्सेस

टाटा इन्स्टीट्यूट ऑफ सोशल सायन्सेस

मुंबई ४०० ०८८

ई-मेल: sandhya@tiss.edu

**अनुक्रमणिका**


| | | |
|---|---|---|
| **१.** | **परिचय**---------------------------------------------- | ३ |
| | पुर्वपिठीका---------------------------------------------- | ३ |
| | परिदृष्य निवेदन------------------------------------------ | ४ |
| | मुल्यांकित निवेदन--------------------------------------- | ४ |
| **२.** | **कृषिविषयक क्षेत्र**-------------------------------------- | ५ |
| | पुर्वपिठीका---------------------------------------------- | ५ |
| | परिदृष्य निवेदन------------------------------------------ | ६ |
| | परस्पर छेदांचे मुद्दे---------------------------------------- | ६ |
| | कार्यवाहीची व्यवस्था------------------------------------- | ९ |
| **३.** | **पशुसंवर्धन सक्षमीकरण**--------------------------------- | १० |
| | पुर्वपिठीका---------------------------------------------- | १० |
| | परिदृष्य निवेदन------------------------------------------ | १० |
| | कार्यवाहीची व्यवस्था------------------------------------- | ११ |
| | परस्पर छेदांचे मुद्दे---------------------------------------- | ११ |
| **४.** | **भौतिक पायाभूत सुविधांची उभारणी**--------------------- | १४ |
| | पुर्वपिठीका---------------------------------------------- | १४ |
| | परिदृष्य निवेदन------------------------------------------ | १५ |
| | विद्युत व उर्जा सुधारणेसाठी कार्यवाहीची व्यवस्था------------ | १५ |
| **५.** | **औद्योगिकरण व उपजीविकांच्या पर्यायांस उत्तेजन**--------- | १७ |
| | पुर्वपिठीका---------------------------------------------- | १७ |
| | परस्पर छेदांचे मुद्दे---------------------------------------- | १७ |
| | परिदृष्य निवेदन------------------------------------------ | २० |
| | कार्यवाहीची व्यवस्था------------------------------------- | २० |
| **६.** | **गरीबी व मानव विकास**--------------------------------- | २५ |
| | पुर्वपिठीका---------------------------------------------- | २५ |
| | परिदृष्य निवेदन------------------------------------------ | २५ |
| | कार्यवाहीची व्यवस्था------------------------------------- | २५ |
| | संबंधित व भविष्यकालीन हस्तक्षेपाची क्षेत्रे------------------ | २६ |
| **७.** | **पर्यटन विकास**------------------------------------------ | ३० |
| | पुर्वपिठीका---------------------------------------------- | ३० |
| | परिदृष्य निवेदन------------------------------------------ | ३० |
| | कार्यवाहीची व्यवस्था------------------------------------- | ३१ |
| **८.** | **विकेंद्रीकरण, सुशासन व सूक्ष्म स्तरीय योजना**------------ | ३२ |
| | परिदृष्य निवेदन------------------------------------------ | ३२ |
| | कार्यवाहीची व्यवस्था------------------------------------- | ३३ |
| | भविष्यकालीन हस्तक्षेपाची क्षेत्रे---------------------------- | ३३ |
| **९.** | **अनुमान**----------------------------------------------- | ३९ |

# १. परिचय

**पुर्वपिठीका**[१]

१.१ अहमदनगर जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ सुमारे १७४१३ चौरस कि.मी. असुन हा जिल्हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा जिल्हा आहे व त्यात १४ तालुके आणि १५९१ गांवे आहेत. तसेच अहमदनगरचे राज्यातील काही महत्त्वाच्या शहरांशी उदा. पुणे, मुंबई, नागपुर, औरंगाबाद आणि नाशिक इ. शहरांशी संबंध जोडलेले असुन या आर्थिक केंद्रांशी विविध पातळ्यांवर जिल्ह्याचा सहयोग आहे.

१.२ आर्थिक प्रगतीबाबत अहमदनगर जिल्ह्याची प्रगती राज्यातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत सन १९९० पासुन कमी होत असून, प्रतीव्यक्ती उत्पन्नाचे प्रमाण देखील अतिशय कमी आहे. परंतू, मराठवाडा विभागातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत अहमदनगर जिल्हाच्या ग्रामीण पातळीवरील अर्थव्यवस्था चांगली आहे. तसेच आर्थिक क्षेत्रातील घडामोडी कमी झाल्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला थोडी मरगळ आलेली आहे व त्यामुळे जिल्ह्याची आर्थिक प्रगती मंदगतीने पुढे जात आहे.

१.३ शहरीकरणाच्या प्रक्रियेसाठी प्रारंभिक कार्य म्हणजे जिल्ह्यातील ग्रामीण संसाधनांचे रुपांतर नागरी क्षेत्रात करणे, ज्यामुळे ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेच्या कार्यवाह्यांत गुणवत्तापुर्ण व संचित प्रगती होऊन, द्वितीय व तृतिय कार्यवाह्यांसाठी कच्च्या मालाची मागणी वाढेल. त्याचप्रमाणे, औद्योगिकरणाच्या प्रक्रियेस कृषि-औद्योगिकरणाच्या दृष्टिकोनातून पहावे लागेल व उत्पादन क्षेत्रात वाढ करावी लागेल.

१.४ अहमदनगर जिल्ह्यात दोन आदर्श गावांची उदाहरणे आहेत. त्यातील एक म्हणजे राळेगणसिद्धी व दुसरे हिवारे बाजार. या दोन गावांनी गावांतील लोकांच्या सहभागाने व जमीन आणि पाण्याचे उत्कृष्ठ संवर्धन करुन कृषिक्षेत्रात आत्मनिर्भरता प्राप्त केली आहे. आज देखील ही दोन गांवे स्वयंपुर्ण असून, त्यांचे आदर्श गांव कसे असावे हा कित्ता भारतातील इतर गावांनी गिरवणे आवश्यक आहे.

१.५ आर्थिक विकासास मारक ठरणारी निम्न स्तर संतुलन जाळी तोडणे, क्षेत्रीय असमानता कमी करणे, लैंगिक व सामाजिक असमानतांशी सामना करणे व निरंतर आर्थिक-सामाजिक विकास चालु ठेवणे इ. अहमदनगर परिदृष्याचे मुख्य उद्देश आहेत. सद्याच्या जागतिकीकरण व प्रतिस्पर्धेच्या काळात आर्थिक व गैर-आर्थिक संसाधनांचे प्रमाण अतिशय दुर्मिळ होत चालले आहे. त्यामुळेच जिल्हा विकास / नियोजनाकडे अतिशय संवेदनशिलतेने पाहिले पाहिजे ज्यामुळे जिल्ह्यातील संसाधनांचा प्रभावी वापर करुन वैचारिक विकास साधुन बहुआयामी प्रश्न सोडवुन जिल्ह्याच्या धोरणांत बहुविध क्षेत्रात सहयोगाने विकास साधता येईल. यातील काही उदाहरणे म्हणजे अर्थव्यवस्थेचे खाजगीकरण, सामाजिक सेवांच्या क्षेत्रात सार्वजनिक-खाजगी सहयोग व विकासकार्यात होत असलेला अशासकीय संस्था / नागरीक संस्थांचा समावेश.

---------------------

१ यात दिलेली माहिती सर्वसाधारण अनुमानांवर दिलेली आहे, जिचे अंतिम अहवालात पुर्नमुल्यांकन करण्यात येईल. यामुळे परिदृष्यांतील काही प्रक्रियांच्या संधी प्रभावित होण्याची शक्यता आहे.

अहमदनगर जिल्ह्याच्या विकासासाठी आम्ही अंगीकार केलेली परिदृष्य व मुल्यांकित निवेदने खालील प्रमाणे आहेत.

**परिदृष्य निवेदन**

सन २०२० पर्यंत अहमदनगर जिल्हा भारतातील अर्ध-शुष्क जिल्हा म्हणून गणला जाईल. यात कृषि क्षेत्रातील टिकाऊ आधुनिकीकरणाने औद्योगिक व सेवा क्षेत्राची प्रगती होऊन जिल्ह्यातील लोकांचा सांस्कृतिक, पारंपारिक, हक्क व मानवी विकास साधला जाईल.

**मुल्यांकित निवेदन**

अहमदनगर जिल्ह्यास एक आदर्श विकासवादी सामाजिक जिल्हा म्हणुन पाहिले जाईल व इतर लोक या जिल्ह्यास विकास केंद्र म्हणून भेट देतील. जिल्ह्याच्या सामाजिक आर्थिक प्रगतीमुळे कृषि क्षेत्रात प्रगतीपर वैज्ञानिक दृष्टिकोन व आधुनिकीकरणास चालना मिळेल. ज्यामुळे जिल्ह्याचे हळू-हळू स्वतःहुन आत्मनिर्भर औद्योगिक जिल्ह्यात रुपांतर होईल. या सामाजिक आर्थिक बदलावाच्या प्रक्रियेमुळेच अहमदनगर जिल्ह्याच्या आर्थिक प्रगतीस चालना मिळेल व त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील मराठवाडा विभागातील इतर क्षेत्रे देखील समाविष्ट होतील.

अहमदनगर जिल्ह्याचे रुपांतर आदर्श समाजात कसे होईल याचे प्रतिबिंब वरील लेखात आले असून, त्यादृष्टीने सकारात्मक प्रयत्न करणे हे आमचे कार्य राहील. याची पहिली पायरी म्हणजे प्रस्तुत परिदृष्य पत्राचे सूत्रीकरण होय.

# २. कृषिविषय क्षेत्र

**पुर्वपिठीका**

२.१ अहमदनगर जिल्हा कृषि अर्थव्यवस्थेचा जिल्हा आहे. सुमारे ५७३,९८२ कुटुंबे शेतीकार्यावर अवलंबुन असून त्यातील सुमारे ४९८,३५५ कुटुंबे शेतकरी असून उर्वरित कुटुंबे शेतमजूर म्हणून काम करतात. या सर्व शेतकरी कुटुंबियांमध्ये १९ टक्के कुटुंबिय अल्प भूधारक (१ हेक्टर पेक्षा कमी) असून, सुमारे ५२ टक्के कुटुंबियांकडे स्वतःची लघू व मध्यम आकाराची शेतजमीन आहे (१-२ हेक्टर ते २-५ हेक्टर). तसेच फक्त १४ टक्के कुटुंबियांकडे मोठ्या म्हणजे सुमारे ५-१० हेक्टर शेतजमीनी आहेत.

२.२ जिल्ह्यातील शेतजमीनमध्ये सुमारे १३.३२ लक्ष हेक्टर मध्ये शेती करण्यात येते. त्यातील ४.६० लक्ष हेक्टर शेतजमिनीवर खरीप हंगामात व सुमारे ७.५८ लक्ष हेक्टर शेतजमिनीवर रब्बी हंगामातील पिके काढली जातात. संपुर्ण शेतजमीन क्षेत्रापैकी २४ टक्के भाग अल्प प्रमाणात सुपीक असून, ३८ टक्के भाग मध्यम सुपीक आहे व ३६ भागच संपुर्ण सुपीक आहे. जिल्ह्यातील खरीप हंगामाची मुख्य पिक म्हणजे तांदुळ, मुग, उडिद, मका, सुर्यफुल, सोयाबीन आणि गहु. इतर नगदी उत्पन्नाची पिके म्हणजे ऊस, कापुस, तंबाखू व भुईमुग इ. तसेच विविध फळफळावळ उदा. आंबा, मोसंबी, पेरू, संत्र आणि डाळींबांचे पिक काढले जाते. तसेच भाजीपाल्यापैकी मुख्यतः कांदा व टोमॅटोचे पिक घेतले जाते.

२.३ जिल्ह्यातील बऱ्याच तालुक्यांत दोन्ही हंगामांच्या काळात बाजरी, कापुस, हरभरा, ज्वारी, उस व गहु यांचे मुख्यतः पिक काढले जाते. बाजरीचे पिक सुमारे ३.४६ लक्ष हेक्टर शेतजमिनीवर काढले जाते, त्याखालोखाल गव्हाचे पिक २.०६ लक्ष हेक्टर जमिनीवर घेतले जाते, कापुस सुमारे १.७० लक्ष हेक्टर, उस सुमारे ०.८७ लक्ष हेक्टरवर पिकवण्यात येतो. ऊसाचे प्रती हेक्टर उत्पादन उच्च असून ते ३.४३ लक्ष क्वींटल इतके आहे, त्यापाठोपाठ बाजरी व गहु सुमारे ०.४१ लक्ष क्वींटल इतका मिळतो. सांप्रत काळी काही शेतीविषयक पदार्थांच्या किंमतींमध्ये बऱ्याच मोठ्या प्रमाणात चढ-उतार झाले, त्यामुळे ह्या पिकांवर अबलंबुन असणाऱ्या शेतकऱ्यांच्या उपजीविकेच्या सुरक्षिततेबाबत संधिग्दावस्था निर्माण झाली होती.

२.४ सांप्रत काळी अहमदनगर जिल्ह्यात काढण्यात येणाऱ्या पिकांमध्ये काही महत्त्वाचे बदल आमच्या लक्षात आले आहेत.

२.४.१ ऊस हे पिक अहमदनगर जिल्ह्यातील नगदी उत्पन्नाचे पिक आहे. जिल्ह्यात सहकारी आणि खाजगी अशा मिळून एकूण १८ ऊस गिरण्या आहेत. ऊस साठवणी केंद्रांत/ गोदामांत ऊस साठवणी सुमारे ५०३५० मेट्रीक टन इतकी होते. जर सर्वच ऊस गिरण्या ६ महिने पुर्ण क्षमतेने चालु राहिल्या तर त्यांना १०० लक्ष मेट्रीक टन ऊसाची आवश्यकता भासेल. सद्याच्या काळात ११५ हजार हेक्टर मधील ७४ लक्ष मेट्रीक टन ऊसाची मळणी/पुरवठा सुरु आहे.

२.४.२ कापुस हे देखील एक नगदी पिक असून शेवगांव, पाथर्डी, जामखेड, कर्जत, राहुरी, श्रीरामपुर, नेवासा आणि कोपरगांव भागात एकुण मिळुन सुमारे १३३०० कापुसाची शेती आहे. चांगली मंडई आणि बीटी टेक्नॉलॉजीमुळे कापसाची लागवड

वाढत आहे. जमिनीची उत्पादन क्षमता कमी असल्याने व पावसाच्या बेभरवश्यामुळे कापसाचे उत्पानद फक्त २.८७ क्वींटल इतकेच झाले आहे. शेतकऱ्यांचे अल्प सुपीक जमिनीवर लक्ष्य केंद्रीत केल्यास २०२० सालापर्यंत कापसाचे उत्पादन ६.०० क्वींटल हेक्टर येण्याची शक्यता आहे.

२.४.३ जिल्ह्यामध्ये डाळींच्या पिकाचे क्षेत्र अपेक्षाकृत जास्त आहे. चवळी, मटकी, चणे, तुर व मुगाची पिके ९३ हजार हेक्टर शेतजमिनीवर काढली जातात व त्यांचे प्रती हेक्टर उत्पन्न १९४० क्वींटल इतके आहे.

२.४.४ सुर्यफुलाची लागवड ८०००० हेक्टर क्षेत्रात करण्यात आलेली असून यासालीचे उत्पन्न सुमारे ७४९६० मेट्रीक टन इतके आहे व प्रती हेक्टर उत्पादन सुमारे ९३७ क्वींटल इतके आहे.

२.४.५ जिल्ह्यातील ६८ हजार हेक्टर क्षेत्रफळावर वृक्षलागवड करण्यात आलेली असून, फळांचे उत्पादन ६२३५९४ मेट्रीक टन इतके झाले आहे. कमीत कमी उत्पादन ८५००० मेट्रीक टन इतके आहे. परिदृष्यात १२८४७१ हेक्टर क्षेत्रात जर फळांचे उत्पादन घेण्याचा व १०४५६५ हेक्टर क्षेत्रफळावर भाजीपाल्याचे उत्पादन घेण्याची योजना आहे. तसेच नापीक जमीन ही लिंबू, हळद, आवळा, सिताफळ इ. राखीव ठेवण्यात आली आहे. तसेच फळे व भाज्यांचे नैसर्गिक उत्पादन कमी असुन ती नाशीवंत असल्याने त्यांची साठवणुक व मुल्यवर्धनासीठी प्रयत्न केले पाहिजेत.

**परिदृष्य निवेदन**

कृषि क्षेत्राचे आधुनिकीकरण करण्यासाठी जैवीक शेती आणि मुल्यांकित भांडवल गुंतवणुक केल्यास कृषि उत्पादन क्षमतेत वाढ होऊन कृषि उत्पादनांची गुणवत्ता व उपजीविकेची साधने तसेच अन्न सुरक्षा सुनिश्चित होईल.

**परस्पर छेदांचे मुद्दे**

२.५ अहमदनगर जिल्ह्यातील कृषि विकासाबाबत काही परस्पर छेदांचे मुद्दे आहेत. अहमदनगर मधील जमिनीच्या मोठ्या भागावर कृषि विषयक कार्य चालते. परंतू बहुतेक पिकांच्या वाढीव उत्पादनासाठी काही विवक्षित धोरण अवलंबिण्यात आले पाहिजे. काही गोष्टींवर जास्त लक्ष केंद्रीत केले पाहिजे त्या अशा:

२.५.१ कृषि वेधशाळा खात्याने जिल्ह्याचे कृषि जलवायु क्षेत्रांत विभाजन केले आहे. अकोले तालुक्याचा पश्चिम भाग, पश्चिम घाट ते पुर्वेकडील टेकड्या, अकोले तालुका सोडून व उर्वरित तालुके हे सर्वसाधारण पर्जन्य क्षेत्रात मोडतात. या कारणामुळे जिल्हा दुष्काळग्रस्त क्षेत्रात येतो. अहमदनगर जिल्ह्यातील अकोले ते संगमनेर तालुक्यांमध्ये पाऊस पडण्याचे प्रमाण वेगवेगळे आहे. अकोले व संगमनेर तालुक्यांत जास्त पाऊस

पडतो. संपुर्ण जिल्ह्यात सरासरी ४९७ सेमी पाऊस ०.८४ लक्ष हेक्टर क्षेत्रात पडतो. जिल्ह्यातील ७० टक्के पाटबंधारे क्षेत्रातील पाण्याचा वापर ऊसाच्या पिकासाठी करण्यात येतो. ४९७ सेमी सरासरी पर्जन्यमान व शेतकऱ्यांना उन्हाळ्यात पाण्याचे दुर्भिक्ष जाणवते. तसेच दर ५ वर्षांनी येणाऱ्या दुष्काळजन्य परिस्थितीमुळे शेतकऱ्यांचे फार नुकसान होते व त्यांची प्रगती खुंटते.

२.५.२ नियंत्रित पाटबंधारे जिल्ह्यात अतिशय कमी प्रमाणात उपलब्ध आहेत. मुळात पाण्याचा वापर पाटबंधाऱ्यांसाठी योग्य प्रमाणात करावयास हवा, ज्यामुळे सध्या उपलब्ध होणाऱ्या पाण्याचे योग्य नियोजन करुन त्याचा वापर प्रभावीपणे करावयास हवा.

२.५.३ अहमदनगर जिल्ह्यात पाटबंधाऱ्यांचे विविध मार्ग उपलब्ध आहेत. जीएसडीए नुसार ८० टक्के जमीन ओलीताखाली असून, २५३ जमीन उप ओलीत आहे, २५३, ८७२ अल्प ओलीताखालील जमीन असून ३४०७ पठारी ओलीत जमीन आहे. या सुविधांमुळे सुमारे १७ लक्ष हेक्टर जमीन पाटबंधाऱ्याखाली येते. तरीही एकूण पठारी ओलीताखालील जमिनीपैकी फक्त ३८६ एकर १०० टक्के पुर्ण आहे. जिल्ह्यात बऱ्याच ठिकाणी जमीन ओलीताखाली करण्याचे काम अपुर्ण राहीले आहे. यामुळे शेतीउत्पादनाच्या अंदाजावर गंभीर परिणाम होतो.

२.५.४ सांप्रत काळी फक्त ३४६ जमीन ओलीताखाली आणण्याचे काम पुर्ण झालेले असून, सन २०२० सालापर्यंत ९४६ ओलीतांचे प्रकल्प पुर्ण करण्याचा मानस आहे. यासाठी शेत्ताळी गावाने राबविलेला महत्त्वाकांक्षी प्रकल्प विचारात घेणे आवश्यक आहे. राळेगणसिद्धी आणि हिरावे बाजार या गावांनी प्राप्त केलेले यश अहमदनगर जिल्ह्यातील इतर भागांत मोठ्या प्रमाणावर राबविणे आवश्यक आहे.

२.५.५ सद्याच्या शेती उत्पादनांची क्षमता वाढविण्यासाठी काही आधुनिक उपायांचा वापर शेती प्रगतीविषयी करावयास हवा. अधिक प्रभावी व कार्यक्षम तंत्रे वापरल्यास उत्पादनक्षमतेत वाढ होण्याबरोबरच भविष्यकालीन उपजीविकेच्या साधनांमध्ये देखील पर्याप्तपणे वाढ होईल. यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची समज येणे आवश्यक आहे, तरीही ज्या प्रमाणात उत्पादनाची वाढ होणे अपेक्षित असते, त्यापेक्षा कमी उत्पन्न मिळते, याचे कारण तंत्रज्ञान, पाटबंधारे व कृषि विषयक विपणनाचे अभिसरण होणे आवश्यक आहे. सद्याच्या काळात उत्पादन खर्चात मोठी वाढ झाली आहे कारण किटकनाशक/ खतांच्या किंमतीत व पिकांच्या सुरक्षिततेच्या इतर पद्धतींच्या खर्चांत वाढ झालेली असून, त्यांचा पिकांच्या विक्रीद्वारे मिळणाऱ्या नफ्यावर परिणाम होत आहे.

२.५.६ महाराष्ट्र राज्य कृषि विपणन मंडळ (एमएसएएमबी) पुणे दिनांक २३ मार्च १९८४ रोजी महाराष्ट्र कृषि उत्पन्न (विकास व नियंत्रण) कायदा १९६३ मधील कलम

३९ ए अंतर्गत स्थापन करण्यात आले आहे जे महाराष्ट्र राज्यातील शेतीविषयक उत्पादनांचे विपणनात तसेच विकास आणि समन्वयात महत्त्वपुर्ण भूमिका निभावते. सांप्रत काळी जिल्ह्यातील बहुतेक तालुके आपल्या कृषि उत्पादनांचे विपणन एमएसएएमबी द्वारे करीत आहेत. यातील काही उत्पादने म्हणजे ज्वारी, बाजरी, भुईमुग, कांदा, सुर्यफुल, कुसुम, काळे वाटाणे, गहु, कापुस, सोयाबीन, हिरवे वाटाणे, टोमॅटो, लिंबू, मका, तांदुळ व कणीस इ.

२.५.७ एकाधिकार खरेदी योजना सद्या आर्थिक अडचणींना सामोरी जात असून त्यामुळे बाजारात जी किंमत देऊ केली जाते त्या रक्कमेच्या पुढे हमी देता येत नाही व यामुळे उत्पादकास कमी मुल्य मिळते. यामुळे एकाधिकार खरेदी योजना दूर करण्याची आवश्यकता असून काही बाबतींत वास्तविक फायद्याची किंमत मिळावी (गहु व तांदळाच्या बाबत). कारण यामुळे बाजार तगुन राहील व जास्त कार्यक्षम होईल. आर्थिक प्रगतीमुळे उत्पादन प्रक्रियेत वाढ होऊन व जिल्ह्यातील अंतर्गत बाजारात प्रतिस्पर्धेमुळे व अन्य ठिकाणांच्या बाजारांत रास्त प्रतिस्पर्धा निर्माण होईल. यासाठीच सहकारी विपणन व खाजगी क्षेत्रातील विपणन सुरु करण्याची नितांत आवश्यकता असून, राज्य सरकारचे नियंत्रण कमी करणे आवश्यक आहे.

२.५.८ एक मजेशीर बाब म्हणजे, अहमदनगर जिल्ह्यात राज्यातील सर्वात उत्कृष्ठ कृषि विद्यापीठ आहे. कृषि विद्यापीठ शेती आणि लागवडीच्या बपाबत विविध गुंतवणुकींच्या योजना राबविण्याची प्रभावी भूमिका पार पाडत आहे. यामुळेच संस्थात्मक प्रगतीची आधारशीला घालण्यात येऊन, जिल्ह्यातील शेतकऱ्यांना माहितीचे वितरण मोठ्या प्रमाणावर करण्यात येत आहे. तरीही, प्रभावी कृषिविषयक सेवांची वाढ सुनिश्चित करण्यासाठी विविध योजना अमलांत आणणे क्रमप्राप्त आहे. यासाठी संस्थात्मक पद्धतीची माहिती व कृषि विस्ताराची माहिती तळागाळातील लोकांपर्यंत पोहचणे आवश्यक आहे याचे संकेत मिळतात.

२.६ रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय)ने जितक्या प्रमाणात शेतीच्या कामासाठी कर्ज द्यावयाचे ठरविले होते त्या संख्येच्या फक्त अर्ध्या संख्येपर्यंतच शेतीविषयक कर्जांचे वाटप करण्यात आले आहे व अर्ध-शुष्क क्षेत्रात फारच कमी वाटप झालेले आहे. सांप्रत काळाच्या आरबीआय समितीने यामध्ये वाढ करण्याची शिफारस केली आहे. यासाठी शेतीविषयक संस्थागत कर्जामध्ये वाढ होण्याची आवश्यकता असून यामध्ये येणाऱ्या छोट्या-मोठ्या बाधा दूर करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील मराठवाडा विभागात सहकार तत्त्वाने चांगलेच मूळ धरले आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे अहमदनगर मध्ये स्थापन केलेली प्राथमिक कृषि पत संस्था (पीएसीएस) ही होय. गेल्या काही वर्षांपासून सहकारी संस्थांकडून औपचारीक ऋण देण्याचे प्रमाण वाढले आहे, तरीही जिल्ह्यात काही अनौपचारीक ऋणको संस्था अस्तित्वात असून त्या कार्यरत आहेत. आर्थिक समावेशात जास्त कठोरतेचा औपचारीक बँकींग क्षेत्रात अभाव आहे. जिल्ह्यात काही सार्वजनिक क्षेत्रातील बँका आहेत त्या कृषिविषयक प्रगतीमध्ये

महत्त्वाची भूमिका निभाऊ शकतात. जिल्ह्यात किसान क्रेडीट कार्ड योजने मोठ्या प्रमाणात राबविण्यास चांगला वाव आहे.

| कार्यवाहीची व्यवस्था |
| --- |
| **उपरोल्लेखित परिदृष्य निवेदनाताली मध्यस्थीचे स्तर ओळखण्यासाठी रणनीतिंचे खालील प्रमाणे विभाग पाडण्यात आलेले आहेत.**<br>**अ. जमीन व पाटबंधारे**<br>१. वनीकरण<br>२. शेतीखालील जमीन (तालुका स्तरावरील नियोजन)<br>३. राष्ट्रीय उद्यानीकरण कार्यक्रमाचे कार्यान्वयन<br>४. खरीप व रब्बी हंगामासाठी व्यवस्था<br>५. मृत्तीका व जल संवर्धन<br>६. एकिकृत किटकनाशक व्यवस्थापन<br>७. उच्च पिक बीजे<br>८. गांव पातळीवरील जैवीक उर्वरक सयंत्रे<br>**ब. मशीनरी व भांडवल गुंतवणुक**<br>१. लघु व अल्प भूधारक शेतकऱ्यांसाठी छोट्या आकारांचे ट्रॅक्टर्स<br>२. एनएचएम मध्ये प्रस्तावित केलेले हरितगृह तंत्रज्ञान<br>३. शेतीचा अंदाज व भविष्यवाणी करण्यासाठी जीआयएस तंत्रज्ञान, जीपीएस चे संगणकीकरण<br>४. रोपे सडल्यावर कर्जावर किंवा गुंतवणुकीवर अनुदान देणे<br>५. जीपी स्तरीय गोदामे व संग्रहण पद्धती<br>**क. उद्योजकता विकास व कौशल्य निर्माण**<br>१. उत्कृष्टता गौरवासाठी केंद्र केव्हीके<br>२. लागवडीसाठी गुणवत्तापुर्ण प्रमाणे वापणाऱ्या शेतकऱ्यांसाठी ऋण व कर्जाची सोय<br>३. पुरुष व महिला शेतकऱ्यांच्या साक्षरतेसाठी व शेतीच्या कामांची अधिक माहिती देण्यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये ग्रामीण किसान शाळा<br>४. बाजार व मुल्यांची माहिती देण्यासाठी ब्लॉक स्तरीय छोटी माहिती केंद्रे<br>५. कृषि विकासासाठी आयसीटी तंत्रज्ञान<br>**ड. पत व विकास बाजार**<br>१. प्राथमिक कृषि पत संस्थांचे पुनर्भांडवलीकरण<br>२. टपाल कार्यालये/ अग्रगण्य बँकांद्वारे केकेसींचे व्यवस्थापन व बचत आणि गुंतवणुकीच्या संधी<br>३. विविध पत, बचत व विमा योजनांसाठी औपचारिक बँकींग व्यवस्थांचे विस्तारीकरण<br>४. ब्लॉक स्तरीय पणन बाजारात खाजगी क्षेत्रातुन गुंतवणुक<br>५. खाद्य व अखाद्य जिन्नसांसाठी जि.प. स्तरीय एकत्रित आधुनिक बाजार |

# ३. पशुसंवर्धन सक्षमीकरण

**पुर्वपिठीका**

३.१ पशुपालन हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे ज्यामुळे जिल्ह्याच्या गावांतील बऱ्याच कुटुंबियांस उपजीविकेची पर्यायी साधने उपलब्ध होतात. या आर्थिक क्षेत्रात पशु व कुक्कुटपालन, पशु आरोग्य व रोगनियंत्रण, रोग निवारण आणि पर्यवेक्षण, जैवीक व संवेदनक्षम वस्तुंचे उत्पादन, जैवीक प्रगतीपर कार्यक्रम, मौलिक पशुचिकित्सा शिक्षण, संशोधन इ. क्षेत्रांत व्यवस्थापकिय विकास व प्रजनन धोरणांची अंमलबजावणी करण्यास वाव आहे. महाराष्ट्र पशु व मत्स्यपालन विज्ञान महाविद्यालय (एमएएफएसयु), ही या क्षेत्रात कार्यरत असणारी एक प्रमुख संस्था असून, या संस्थेद्वारे वरील क्षेत्रांत तज्ञ तंत्रज्ञान पुरविले जाते. एमएएफएसयुने सहकारी तत्त्वावरील कुक्कुटपालन केंद्र व घराच्या पाठीमागील कुक्कुटपालन वृद्धिंगत होण्यास एसएचजीस्चे अधिष्ठापन केले आहे. ज्यामुळे पशुंच्या उत्पादन, चारा व पशुखाद्य विकासासाठी माहितीचे विश्लेषण करण्यात येते व स्थानिक प्रजनन, पशुजीवांचा विकास व संवर्धन, निर्यातयोग्य पशु उत्पादनातील गुणवत्ता नियंत्रण करता येते.

३.२ जिल्ह्यातील १७ टक्के कृषिविषयक कार्यांच्या अनुपाताने पशुसंवर्धानाचे घरगुती उत्पादन फक्त ५ टक्के आहे. जिल्ह्यातील जमीन धारण न करणारे मजूर, अल्प व मध्यम भूधारक यांच्याकडे एकूण पाळीव पशुंपैकी ७० टक्के भाग आहे. यातील ६६ टक्के भागाचे पशुपालन ग्रामीण जनतेमार्फत केले जाते. या क्षेत्रातील विविध कार्यांमधील ब्रॉईलर उत्पादनाचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे २० टक्के इतके आहे, त्याखालोखाल मांसपदार्थांचे उत्पादन ११ टक्के होते, कुक्कुटपालन व अंडी उत्पादन १० टक्के होते, दुग्धोत्पादन फक्त ४.६ टक्केच होते.

३.३ विविध योजनांखाली पशुसंवर्धन क्षेत्रात विकास करण्यास वाव आहे. यात पशुचिकित्सा पायाभूत सुविधा उभारणी, सद्याच्या पशुपालन पद्धतीमध्ये पशुंचे वैज्ञानिक पद्धती वापरुन जैवीक संवर्धन करुन त्यांचे उत्पादन वाढविणे व स्थानिक प्रजननाचे संवर्धन, पशुरोगांवर नियंत्रण, ग्रामीण भागांत चांगल्या पद्धतीने पशुसंवर्धन करुन स्वयंरोजगार स्थापन करणे व समाजातील कमजोर स्तरांवरील लोकांचा विकास करणे, निर्योतयोग्य पशुउत्पादनासाठी "रोगमुक्ती योजना" कार्यक्रम इ. कार्य करता येतील. यासाठी सम आयामी संस्थागत विकास करण्याची जरुरी असून खाद्य निरिक्षक व पशुचिकित्सा निरिक्षकांची संख्या वाढविणे आवश्यक आहे, ज्यामुळे ते मानके व गुणवत्तांचे व्यवस्थित तपासणी करुन उत्पादनाचे क्षमता वाढवु शकतात.

**परिदृष्य निवेदन**

पशुंच्या गुणवत्तेमध्ये मौलिक वाढ करण्यासाठी व कुक्कुटपालन आणि दुग्धशाळा उद्योगाच्या आधुनिकीकरणासाठी सहकारी संस्था व एसएचजीस् चे सक्षमीकरण करणे आवश्यक आहे.

| कार्यवाहीची व्यवस्था |
| --- |
| **अ. पशुंच्या अनुवांशिकतेमध्ये प्रगती**<br>१. प्रजनन योजनांमध्ये कृत्रिम बायोमेट्रीक पद्धतींचा समावेश करणे<br>२. जनावरांच्या चारा व पाण्याची चांगली प्रगतीपर व्यवस्था करणे<br>३. जैवतंत्रज्ञानाची माहिती सर्व जनतेस देण्यासाठी संघटनात्मक परिषदांचे आयोजन करणे<br>४. पशुंच्या आरोग्य संवर्धनासाठी ब्लॉक स्तरांवर रुग्णालये / पशुचिकित्सा सुश्रुषालये बांधणे |
| **ब. संस्था, मशीनरी व भांडवल**<br>१. पशुसंवर्धन व त्यासंबंधित इतर कार्यांचे आधुनिकीकरण<br>२. पशुचिकित्सा प्रशिक्षण संस्थांचा विकास<br>३. एसएचजीस् चे पुनर्भांडवलीकरण, उच्च पत असलेल्या सहकारी संस्थांकडून करणे व नाबार्ड कडून आर्थिक मदत प्राप्त करणे.<br>४. आयसीटी तंत्र वापरुन सरमिसळ होऊ न देता उत्पादन ते वितरण व्यवस्थांमध्ये पुरवठा श्रृंखला निर्माण करणे<br>५. गुरे विमा योजना राबविणे |
| **क. विपणन, अधिकार व गुणवत्ता नियंत्रण**<br>१. खाद्य व औषधे निरिक्षक यांची संख्या वाढविणे तसेच उत्पादन मानकांच्या सेवा वाढविणे<br>२. गाव पातळीवर समित्या स्थापन करुन सद्यःस्थितीमधील कार्यक्रम/ योजना प्रभावीपणे राबविणे.<br>३. बाजारी उत्पादनांसाठी खाजगी क्षेत्रातील किरकोळ व्यापारी श्रृंखला आमंत्रित करणे |

**परस्पर छेदांचे मुद्दे**

३.४ अल्प गुणवत्ता राखल्याने पशु व कुक्कुटपालनांचे उत्पादन फार कमी मिळते. या क्षेत्रात उत्पादन दर वाढविण्यासाठी पशु व गुरांच्या आनुवांशिक रचनांमध्ये गुणवत्ता व मौलिक स्वरुपाची गुंतवणुक करणे आवश्यक आहे, ज्यामुळे पशु व गुरांची वाढ अधिक होईल. यातील काही संवेदनक्षम क्षेत्रे म्हणजे स्थानिक (शासकीय व खाजगी) पशुचिकित्सा दवाखान्यांत कृत्रिम बीजारोपण योजना राबविणे. तसेच त्यांना गोठवलेली विर्य इ. पुरविणे व कृत्रिम बीजारोपण कार्यक्रमांत अशासकीय संस्थांची मदत घेणे.

३.५ पशुसंवर्धन सेवांमध्ये काळजीपुर्वक लक्ष देण्याची आवश्यकता आहे. काही शेतकऱ्यांना तर पोषक तत्त्वे कशी द्यावीत याची मानके व आदर्श देखील माहित नसतात त्यामुळे पशु व गुरांच्या गुणवत्तेवर परिणाम होतो. शेतकऱ्यांना पोषक तत्त्वे कशी तयार करावीत, संतुलित आहार, बीज पुरवठा इ. मुळे ते प्रती हेक्टर अधिक खाद्य निर्माण करु शकतात. तसेच याबाबत खाजगी सहकारी सोडीयम उत्पादक गिरण्यांची मदत घ्यावी किंवा सोडीयमचा वाजवी दरांत पुरवठा करण्यात यावा. तसेच बायपास प्रथिने गिरण्या चालविणे. तसेच खाद्य तयार करण्यासाठी युरीयाचा उपयोग करणे इ. बाबत जागरुकता यावी म्हणून माहिती पुरविणे.

३.६ बळी देण्यासाठी योग्य असलेल्या रोगमुक्त पशुंपासुन चांगले व स्वच्छ मांस उत्पादन करतांनाच त्यांचे उपयोगी व उच्च आनुवांशिक पदार्थ वाचविणे तसेच पशुंचे आरोग्य सुस्थितीत राखणे. पशुंचे विक्रीमुल्य, वजनकाटे यांची मोजमापे स्थिर करणे, उच्च गुणवत्तेची आयओएस पशुवधगृहे स्थापन करणे, कुक्कुटपालन केंद्रांचे मांस व त्यांची पॅकींग प्रक्रिया सुधारणे.

३.७ कुक्कुटपालन उद्योग व घरामागील कुक्कुटपालनाच्या विकासास प्रोत्साहन देणे व यासाठी सहकारी तत्त्वावर प्रारंभ करणे.अंड्यांचे उत्पादन वाढविण्यासाठी उच्च बीजांचे पक्षी जसे वनराजा, कडकनाथ व गिरीराज यांच्या कुक्कुटपालन केंद्रांस पुरवठा करणे तसेच या क्षेत्रात अंडी उबवणी केंद्रे, आनुवांशिकी सुधारणा व विकास केंद्रे तसेच देशी पक्ष्यांचे संवर्धन, कुक्कुटपालन व लसीकरण योजना राबविणे.

३.८ आनुवांशिकीय सुधारणा, स्वच्छतेवर प्रात्यक्षिकाह प्रशिक्षण, सोडीयम मिक्श्चर खाद्य, लसीकरण योजना, खाद्यपुरवठा व प्रथमोपचार. बछड्यांमधील अप्रजनन कमी करणे. लोकर काढण्याची मशीन पुरविणे, लोकर दलाल एजंटांचा कमीत कमी सहभाग घेणे, यासाठी लोकर विपणन लिलाव समितीची स्थापना करणे, मेंढी व बकऱ्यांच्या चामड्यांवर प्रक्रिया करण्यासाठी उद्योगधंद्यांची वाढ करणे इ.

३.९ खाद्य व चराऊ कुरणांचे उपलब्धतेसाठी राज्यात आवश्यक ते प्रयत्न करणे. पशुंचा चारा उगवण्यासाठी नापीक किंवा अल्प गुणवत्ता जमीनीचा वापर करुन अझोलीया व फर्न पद्धतीचा वापर करणे तसेच पशुचारा डेपोमध्ये पशुखाद्यगृहे बांधणे, दुष्काळी परिस्थितीत पशुचाऱ्याची साठवणुक करणे.

३.१० पशुंचे संक्रमक रोग जसे पीपीआर (पेस्टीस डेस पेस्टीस रुमिनन्ट्स), पायाचे व तोंडाचे रोग, ब्रुसेलोसीस, रेबीज, हॅमरहेगीक सेप्टीकामीया, ब्लॅक क्वार्टर या रोगांपासुन पशुंचे संरक्षण करणे. तसेच राणीखेत रोग, सालमेलुसीस या रोगांपासुन कुक्कुटपालन केंद्रांचे संरक्षण करणे व रोगमुक्त विभाग बनविणे, बाजाराच्या ठिकाणी नियमित लसीकरण, बॅक्टेरीयल मुक्त मोफत औषधे व पशुंचा व बछड्यांचा मृत्युदर कमी करणे, बछडे व पाड्यांना दुध तसेच चिक पाजण्याची माहिती, प्रसवानंतरच्या अडचणी जसे दुध पाजणे, गर्भारपणातील अडचणी व दुग्धजन्य रोग, गुरांचे योग्य विपरीत बीजांकुरण, गोठ्यांची स्वच्छता व त्यांत विषाणु मारक औषधांची फवारणी, तसेच ब्लॉक पशुचिकित्सा संस्थेस विषाणुमेळे परसलेल्या रोगांची माहिती देणे व त्या रोगांवर प्रतिजैविके वापरणे तसेच रोगांची ब्लॉक प्रयोगशाळेत तपासणी इ.

३.११ पशु व कुक्कुटांस प्रभावी व कार्यक्षम आरोग्य सुरक्षा पुरविणे. यासाठी पशुचिकित्सालयांच्या जाळ्याचा वापर करणे ज्यामुळे प्रतिबंधक व रोगनिवारक धोरणांची अंमलबजावणी करुन पशुंची प्रसवता योग्य मानकांनुसार करता येईल व त्यांना पशुचिकित्सा प्राप्त होईल. तसेच पशुचिकित्सा सेवा व पशुचिकित्सा विज्ञान यांचे शिक्षण देणे जे भारतीय पशुचिकित्सा समिती कायदा १९८४ नुसार अत्यावश्यक आहे. ब्लॉक स्तरावरील पशुचिकित्सकीय लघु सुश्रुषालयांचे सुदृढीकरण व

प्रयोगशाळांचा विकास तसेच फिरती पशुचिकित्सालये जिल्हा पातळीवर स्थापन करुन सेवा पुरविणे तसेच शेतकऱ्यांच्या खाजगी सहकारी संस्था, एन.जी.ओ., खाजगी पशुचिकित्सालये, खाजगी दुध संघ बळकट करणे. अहमदनगर जिल्ह्यात २३१ पशुचिकित्सालये असून २२६ चिकित्सालयांचे व्यवस्थापन जिल्हा परिषदांमार्फत करण्यात येते. २० इमारती मोडकळीच्या अवस्थेत आहेत. एक आधुनिक पशुचिकित्सालय ज्यात अत्यावश्यक औषधे, कृत्रिम बीजारोपण, लस प्रतिबंधके, बैलांचे खाद्य, विर्य तपासणी, गर्भचिकित्सा, कमाल व मध्यम शर्करा तपासणी इ. सोईंसह आवश्यकता आहे. अशा पशुचिकित्सा केंद्रांचे अभिलेख कंप्युरमध्ये जतन करणे व विविध गुरांवर केलेल्या विविध चिकित्सांचे अभिलेख जतन करणे आवश्यक आहे.

३.१२ विविध प्रशिक्षणे आणि उच्च प्रेरणा देऊन मानव संसाधनांचा विकास करणे आवश्यक आहे. तसेच कर्मचाऱ्यांस विविध आव्हाने स्वीकारण्याचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

३.१३ पशु आरोग्य शिबिरांचे आयोजन, कार्य-अभियाने, उपयुक्त प्रशिक्षण कार्यक्रम यांचा सहयोग आणि विस्तारासाठी उपयोग करुन अशासकीय संस्थांची मदत घेऊन पशुंचा विकास करणे आवश्यक आहे. तसेच स्थानिक पशुंचे प्रजनन करणे आवश्यक आहे. इ-गव्हर्नन्स व कागदविरहीत कार्यालयीन कामे आय-टी चा उपयोग करुन करणे आवश्यक आहे. बाजाराच्या ठिकाणी दृकश्राव्य माध्यमे वापरुन शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे शिक्षण देणे. पंचायत समित्यांना ग्रामीणांस पशु विकास कार्याचे प्रशिक्षण देण्यासाठी ध्वनीवर्धक यंत्रणा असलेली वाहने उपलब्ध करुन देणे.

३.१४ दुग्धउत्पादनाबाबत जागरुकता, पाड्यांची सुप्रजनन, प्रजनन प्रकोप इ. आदर्श गोठे बांधण्याचे प्रशिक्षण, ५ गाईंच्या गोठ्याची माहिती व त्याला लागणारे सामान, दुध काढण्याचे मशीन इ. ची माहिती देणे. पशुंचे विरोधी प्रजनन करताना तापमान ७० ते ८० डिग्री फॅरनहाईट राखणे व स्प्रिंकलरचा गोठ्यात वापर करुन तापमान नियंत्रित करणे तसेच उच्च विरोधी प्रजनानात विदेशी रक्त वापरणे इ. गोठ्यातील भिंतींचे गोचीडांपासून संरक्षण करणे.

३.१५ भारत सरकारने गुरे सुरक्षा योजनेमध्ये ५० टक्के अनुदान देऊन जास्त दुध देणाऱ्या गाई / म्हशी यांना संरक्षण देण्याची योजना अहमदनगर, पुणे, कोल्हापुर, सातारा, सांगली आणि सोलापुर इ. जिल्ह्यांसाठी मार्गदर्शक तत्त्वावर मान्य केली आहे. तसेच गाई व म्हशींच्या विम्यावर ५० टक्के अनुदानासाठी रु.७७० करोड इतका निधी राखीव ठेवला आहे. या प्रयोजनात जाहीरात, प्रचार इ. कामे पशुचिकित्सकांकडून करुन घेण्याचा मानस आहे. सन २००६-०७ या काळात रिल्यान्स जनरल इन्शुरन्स कंपनीने व २००७-०८ या काळात ओरीएंटल इन्शुरन्स कंपनी, नागपुर हीने पशु विम्यावर रु.४३६.१३ लक्ष रुपये खर्च केला आहे. उर्वरित रक्कम रु.३३४ लक्ष २००९-१० या काळासाठी पशु विमा रक्कम म्हणून (नागपुर, भंडारा, गोंदीया, वर्धा, यवतमाळ, जालना, बीड, औरंगाबाद, लातुर, नांदेड, नाशिक, जळगाव, अहमदनगर, पुणे, कोल्हापुर, सातारा, सांगली, सोलापुर) मान्य करण्यात आली आहे. याचे कार्य आदेश टाटा एआयजी जनरल इन्शुरन्स कंपनी, नागपुर व युनायटेड इंडिया इन्सुरन्स कं. नागपुर यांना देण्यात येऊन सन २००९-१० च्या योजनेवर रु.३४.६९ लक्ष रुपये खर्च करण्यास सांगण्यात आले आहे.

# ४. भौतिक पायाभूत सुविधांची उभारणी

**पुर्वपिठीका**

४.१ अहमदनगर जिल्ह्यास उत्कृष्ठ स्तरीय पाटबंधारे व त्यास भूजल व ओलीताखालील उपचारांची जोड देण्यात आलेली आहे. ग्रामीण भागाताल बहुतांश विद्युतीकरण व औद्योगिक उर्जा ग्रहणामुळे जिल्हा मोठ्या धरणांवरील जलविद्युत उर्जा प्रकल्पांवर निर्भर आहे. जिल्ह्यातील मुख्य पाटबंधारे पद्धतीमध्ये कमाल, मध्यम व किमान धरणांतील व विहिरींतील जल उत्कर्ष पद्धतींचा समावेश होतो. जिल्ह्यात मुळा व भंडारदरा अशी दोन प्रमुख पाटबंधारे धरणे आहेत. पाटबंधाऱ्यांमध्ये जलवितरण विविध कालवे काढून केलेले आहे. उदा. गंगापुर (अप्पर गोदावरी कालवा), नाशिक जिल्हा, व घोड आणि कुकडी प्रकल्प, पुणे जिल्हा. या सर्व प्रकल्पांची एकूण पाटबंधारे क्षमता २०८ हजार हेक्टर एवढी आहे. तसेच विसापुर आढळा, पारगांव, घाटशीळ, मंडोहोल, भोजपुर, माहे सांगवी व सिना येथे मध्यम स्तराचे प्रकल्प आहेत व ते ७१ हजार हेक्टर क्षेत्रात पाणीपुरवठा करतात. तसेच ९० लघु स्तराचे प्रकल्प असून त्यांची एकूण पाटबंधारे क्षमता २३ हजार हेक्टर इतकी आहे. बहुतेक लघु स्तरीय प्रकल्प कोल्हापुर पद्धतीचे बंधारे बांधुन तयार करण्यात येऊन त्यांपासून जिल्ह्यास फायदा होत आहे.

४.२ जिल्ह्यात जलविद्युत जुन २००१ पासुन तयार होते. ही जलविद्युत भंडारदरा जलविद्युत प्रकल्प फेज १ (१२ मेगावॅट) व भंडारदरा जलविद्युत प्रकल्प फेज २ (३४ मेगा वॅट) यांपासुन मिळते. घाटघर जलविद्युत पंपाची संचयन क्षमता २५० एमडब्ल्यु तिकी असून २००५ साली हा विद्युत प्रकल्प दोन भागात विभागण्यात आला आहे. परंतू मुसळधार पाऊस व मोठ्या प्रमाणातील भूस्खलनामुळे या प्रकल्पास बाधा उत्पन्न झाली असून याची किंमत रु.१,१८४ करोड पासून रु.१,३०० करोड इतकी वाढली आहे. याचे पहिले युनिट जानेवारी २००७ साली पुर्ण होण्याची अपेक्षा होती व दुसरे युनिट मार्च २००७ साली पुर्ण होण्याची अपेक्षा होती. परंतू अजुनही काही काम अपुर्णावस्थेत आहे. या योजनेत उच्च पातळीवरील जल निम्न पातळीवर सोडण्याची योजना होती. या योजनेत साप्ताहिक चक्र दैनंदिन ६ तास असे होते व पंपींग दैनंदिन ७ तास असे होते जे सोमवार ते शनिवार ठेवण्यात आले होते. सदर प्रकल्पापासून २५० एम डब्ल्यु विद्युत भूगर्भीय उर्जा सयंत्राने प्राप्त करण्याची योजना आखण्यात आली आहे.

४.३ याव्यतिरिक्त अकोले आणि संगमनेर तालुक्यात पाच छोटे जलविद्युत उ्जा प्रकल्प चालु आहेत. अकोले तालुक्यात अंबीत तलाव व पिंपळगाव खंड असे दोन तलाव असून त्यांद्वारे २ मेगा वॅट विद्यात निर्मिती होते. तसेच संगमनेर तालुक्यात लिबिंदरी तलाव, तमकाडे धबधबा व कोळेवाडी तलाव यांपासुन १०२ मेगा वॅट उर्जा प्राप्त होण्याची अपेक्षा आहे. उर्ध्व प्रवरा निळवंडे धरणाद्वारे जलविद्युत (१०.५० मेगा वॅट) प्राप्त करण्याचे प्रयोजन आहे.

४.४ सद्यःस्थितीत जिल्ह्यात कोणतेही औष्णिक किंवा जलविद्युत प्रकल्प नाहीत. जिल्ह्यातील विद्युत ग्रहणाचा विचार करुन एमएसईबीने जागतिक बँकेच्या मदतीने विविध सबस्टेशन्सच्या विस्तारांचे कार्य हाती घेऊन विविध तालुक्यांत विद्युत पुरवठा करण्याचे नियोजन केले आहे. घाटघर येथे पंप धारण योजना बसवण्याचा प्रस्ताव आहे. अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यात प्रवरा नदीवर अप्पर धरण बांधण्यात आले आहे. या धरणाची एकूण क्षमता ५.८७ मिलियन क्युबीक मीटर्स इतकी असून,

याचे लाईव्ह स्टोरेज सुमारे ५.२१ मिलियन क्युबीक मीटर्स इतके गणन्यात आले आहे. घाटघर प्रकल्पातील स्टोरेज व पंपींग मुळे २५० मेगा वॅट जलविद्युत निर्माण करण्याचा मानस आहे.

४.५ जलविद्युत प्रकल्पाद्वारे विजनिर्मिती हा जिल्ह्यातील कळीचा विषय आहे. कारण जिल्ह्यातील ग्रामीण अर्थव्यवस्था व शेती तसेच पशुपालन व औद्योगिक क्षेत्र याच प्रकल्पांवर अवलंबुन आहेत.जलविद्युत प्रकल्पावर विशेषतः अवलंबुन राहण्याने जिल्ह्यात आवश्यक ती उर्जा प्राप्त होऊन तिचा घरगुती व औद्योगिक वापर करता येईल. तसेच उर्जेचे इतर स्त्रोत जसे सौरउर्जा व जैवीक उर्जा यांचां देखील वाढत्या उर्जेच्या मागण्या पुर्ण करण्यासाठी विचार करणे आवश्यक आहे. याव्यतिरिक्त, उर्जा जनरेटरांचा पर्याय देखील पर्यावरणाच्या व पशुसंवर्धन आणइ लोकसंख्येचे स्थानांतरण यांच्या दृष्टीने काही विचार करावा लागेल.

४.६ स्थिरतेच्या दृष्टिकोनातून पाहता, अहमदनगर जिल्ह्यातील उर्जा वितरणाचे व्यवस्थापन सार्वजनिक क्षेत्रातर्फे मोठ्या प्रमाणात पाहिले जाते. त्यामुळे उर्जा वितरण कमी किंमतीत होऊन देखील काही ठिकाणी जास्त दर व काही भौगोलिक विभागांत आणिअथवा अर्थव्यवस्थेच्या कार्यांत दुर्लक्ष केले जाते.

**परिदृष्य निवेदन**

स्थिर भौतिक पायाभूत सुविधांच्या उभारणीचा वेग वाढविण्यासाठी तसेच अर्थव्यवस्थेच्या कार्यांची जोडणी सुधारण्यासाठी व बाजार आणि जागांवर सामाजिक-आर्थिक विकास साधण्यासाठी काही महत्त्वाचे कार्य आवश्यक आहे.

| कार्यवाहीची व्यवस्था |
|---|
| **अ. पाटबंधारे, जलविद्युत व उर्जा निर्मिती**<br>१. एकत्रित पुर्ननिर्माण योग्य उर्जा वितरण केंद्रे<br>२. सौर, जैव उर्जा, बुगास योजना घरगुती विद्युतीकरणासाठी<br>३. जिल्ह्याचे जल-भौतिक आरेखन पाटबंधारे प्रकल्पांच्या योजनेसाठी<br>४. उद्योगांसाठी स्पर्धात्मक दरांचे नियोजन<br>५. विद्युत पारेषणासाठी स्वायत्त संस्था<br>६. गांव/एनपी पातळीवर उर्जा स्थानके शेतीविषयक व एचएच कार्यांसाठी<br>७. एमएसईबी निर्मिती व वितरण दरांचे प्रभावी सुधार<br>**ब. महामार्ग, लोहमार्ग व वाहतुक**<br>१. जिल्हा वाहतुक व पायाभूत सुविधा निधी<br>२. सर्व हवामानीय रस्ते जे मानवी, सामान व सेवांची वाहतुक करु शकतात<br>३. मध्यम गेज लोहमार्ग सुधारणा तसेच सर्व एनपी सुविधांची सामानाच्या जलदगतीसाठी शेतजमिनीपासून औद्योगिक क्षेत्रात व बाजारांत नेआण करण्याची क्षमता वाढविणे<br>४. मल्टी एक्सल व मध्यम आकाराच्या ट्रकचा / टेम्पोंचा वापर करुन सामान/ सेवांची वाहतुक<br>५. उच्च क्षमतेची गोदामे व साठवणुक केंद्रांचे जीपा/एनपी पातळीवर तरतुद |

**क. बँकींग व रियल इस्टेट**

१. बँका/ सहकारी बँकांची भांडवल उभारणी / आयडीएफसीचा परिचय
२. जमा, बचन, गुंतवणुक, हुंडी व्यावसायिक व एच एच कारणांसाठी
३. एसएचजी चे प्रभावी नेटवर्थ सह पुनर्भांडवलीकरण
४. लघु उद्योजक विकासासाठी निधी
५. निवासी जागांचे विकसन करुन एनपी पातळीवर उच्च अभिवेश व सेवां देऊन इतर जिल्ह्यातील लोकांना स्थलांतरणासाठी उद्युक्त करणे.
६. अनुसुचित सामाजिक समुहांच्या व युवकांच्या व स्त्रीयांच्या उद्धारासाठी विशेष कर्ज व सेवा योजना

**ड. नियंत्रण व अधिकार**

१. झेडपी / कलेक्टरेटच्या संपुर्ण अधिकारांची भूमिका
२. जीपी / एनपी पर्यवेक्षण प्रवेश व भौतिक पायाभूत सुविधांमध्ये वापर
३. युझर ग्रुपद्वारे सामाजिक लेखा परिक्षण ज्यामुळे गळती व अकार्यक्षमता टाळल्या जातील
४. झेडपी/कलेक्टरेट/सर्वोच्च संस्था जिल्हा स्तरावर
५. सर्व एजन्सीद्वारे योजनांचे / कार्यक्रमांचे प्रभावी कार्यान्वयन

# ५. औद्योगिकरण व उपजीविकांच्या पर्यायांस उत्तेजन

**पुर्वपिठीका**

५.१ अहमदनगर जिल्ह्याचे औद्योगिकरण अजुनही शैशवास्थेत आहे. अर्थव्यवस्थेच्या विस्ताराचे ३ मार्ग आहेत. i) प्राथमिक ते दुय्यम क्षेत्र ज्यात प्राथमिक विभागाचे उत्पादन हे दुय्यम क्षेत्राचा कच्चा माल असतो, ii) प्राथमिक ते तृतिय क्षेत्र, ज्यात प्राथमिक क्षेत्रातील उत्पन्न हे थेट विक्रीसाठी, व्यापारासाठी व बाजारात उपलब्ध असून त्याचा वापर घरगुती आणि बाह्य क्षेत्रात केला जातो आणि iii) बहुक्षेत्रीय विकास प्रक्रिया ज्यात सर्व क्षेत्रांचा एकत्रित विकास होतो. लक्षात ठेवा की, स्थिर गुंतवणुकीमुळे अर्थव्यवस्थेचा हळू हळू विकास होतो.

५.२ महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार ग्रामीण भागातील जिल्हा ब्लॉक स्तरांचा विकास सहकार क्षेत्राखाली येतो. जरी शासकीय विकास योजना व औद्योगिकरण योजना जिल्ह्यात यापुर्वीच सुरु झाल्या असल्या तरीही. एमआयडीसीने दिलेल्या सुविधांमुळे जिल्ह्यात लघु व उच्च पातळीवरील उद्योग आकारास येत आहेत. डीआयसी द्वारे औद्योगिक निर्देश देण्याने जिल्ह्यात उद्योगांची वाढ होताना दिसते.

५.३ अहमदनगर जिल्ह्यातील अंदाजित कामगार सहयोग दर हजारी ६६८ कामगार असा आहे. व लोकसंख्या ०-५ वर्षे ते ६-१४ वर्षे अशी असून वार्षिक २२८ दर हजारी जनसंख्या असा आहे. यावर असा संकेत मिळतो की, अहमदनगर मध्ये उपलब्ध असलेली अल्प मानवीउर्जा अर्थव्यवस्थेच्या प्रगतीस सहाय्यरी शाबीत होत आहे.

५.४ सन २००८-०९ नुसार जिल्ह्यात ४५८९ उद्योगांची नोंदणी झालेली असून त्यांत एकूण २१८६१ कामगार काम करतात. लघु उद्योग क्षेत्रात ३५० उद्योगधंदे असून त्यांमध्ये १९६० कामगार काम करतात. या क्षेत्रात एकूण रु.२१४० लक्ष रुपयांची गुंतवणुक झालेली आहे. उद्योगांच्या वर्णपटात हेवी व लाईट अभियांत्रिकी उद्योग देखील येतात. मुख्य उद्योगधंदे श्रीरामपुर, राहुरी, अमदनगर शहर व सुपा पारनेर आहेत. काही मोठ्या प्रमाणातील निर्मिती उद्योगांत लार्सन अँड टयुब्रो, किर्लोस्कर व सरस प्लॅस्टीक यांचा समावेश होतो.

५.५ मजेशीर बाब अशी आहे की, उद्योगधंद्यांच्या उभारणीसाठी आवश्यक असलेल्या प्राथमिक गरजा जसे जमिनीची उपलब्धता, कामगार व कच्चा माल यांचे भरपुर प्रमाण अहमदनगर जिल्ह्यात आहे. त्यामुळे कृषि उद्योगावर जोर दिल्यास उत्पादनक्षमताच वाढणार नसून जास्त लोकसंख्येस अधिक उत्पन्न मिळेल तसेच जास्त प्रमाणात कामाच्या संधी उपलब्ध होतील. यामुळे लघु उद्योजकांस नवीन उद्योग उघडण्यास सोपे जाईल व त्यांना या वातावरणात सेवा पुरवणे देखील सोपे होईल.

**परस्पर छेदांचे मुद्दे**

५.५ भौतिक पायाभूत सुविधांच्या प्रगतीचे विविध पैलू आहेत:

५.५.१ २१०.७ कि.मी. लांबीचा राष्ट्रीय महामार्ग जात असून जिल्ह्यातील एकूण रस्त्यांची लांबी १२४९४.१७ कि.मी. आहे. जिल्हा लोहमार्ग व महामार्गान्वये इतर ठिकाणांशी जोडला गेलेला आहे.

५.५.२ जिल्हातील मुख्य विद्युत पुरवठा एमएसईबी कंपनीतर्फे करण्यात येतो. याशिवाय काही खाजगी विद्युत पुरवठादार आहेत. सद्या जिल्ह्यात इतर स्त्रोतांमधुन्व जलविद्युत प्रकल्पांतुन स्थिर उर्जा प्राप्त करण्याचे प्रयत्न चालु आहेत. उदा. पवनचक्की उर्जा, बागॅस इ.

५.६ जिल्हा उच्च मुल्य श्रुंखलेच्या दिशेने वाटचाल करत आहे.

५.६.१ बहुतेक संस्था सद्याच्या शेतीच्या प्रक्रियेपासून उन्नत होऊन अधिक बाजार क्षेत्राकडे वळत आहेत. डीआयसी कार्यालयाने अग्रगण्य बँका (सेंट्रल बँक ऑफ इंडिया व इतर राष्ट्रीयकृत बँका), नाबार्ड, यांनी मदत देऊ केली असून, एमआयडीसीने देखील संपर्काची दृढीकरण हाती घेतले आहे.

५.६.२ आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, जैव-तंत्रज्ञानाचा वापर करुन खाद्य प्रक्रिया, संशोधनास प्रोत्साहन, खाद्यान्नामधईल टाकाऊ भाग कमी करणे, संचयनासाठी पायाभूत सुविधांचा विकास, दळण वळण व कृषि खाद्यावर प्रक्रिया करुन पुरवठा श्रृंखलांमधील शेतकरी ते ग्राहक अंतर भरणे तसेच या क्षेत्रात गुंतवणुकीस उत्तेजन देणे इ.

५.६.३ या उद्देशांत लघु उद्योजनक व शेतकऱ्यांस खाद्य प्रक्रिया व त्याअनुषंगीक क्षेत्रात सहयोग करुन, नवीन नोकऱ्या निर्माण करण्याची संधी आहे, तसेच ग्रामीण लोकसंख्येस वाढीव उत्पन्न मिळु शकेल.

५.६.४ विवक्षित कृषि उद्योगांसाठी नवीन एमआयडीसी क्षेत्र विकसीत केले पाहिजे. तसेच एमआयडीसी ने आवश्यक सुविधा ( शीतगृहे, गुणवत्ता चाचणी, वाहतुक, जल आपुर्ती व उर्जा) यांची खाद्य प्रक्रियेसाठी व इतर कृषि उद्योगांसाठी उभारणी केली पाहिजे. बाजार नेहमी निकटतम असले पाहिजेत.

५.६.५ खाद्य प्रक्रिया पार्कची स्थापना केली पाहिजे (दुध व डेअरी उत्पादने, वाईन, तेलबीया) व चर्मोद्येग आणि मांस उद्योग आताच्या एमआयडीसी परिक्षेत्रात स्थापन केले पाहिजेत.

५.६.६ जिल्ह्यामध्ये बँका व नाबार्डच्या मदतीने छोटे शेतकरी व लघु उद्योजकांसाठी विविध योजना निर्माण केल्या पाहिजेत. डीआयसीने बाजार व शेतकऱ्यांच्या मध्ये संपर्क बनवला पाहिजे तसेच कृषि भाग व एंड टू एंड मुल्य श्रुंखला तयार केल्या पाहिजेत जेणेकरुन घरगुती व जागतिक सहाय्याने एसएमई क्लस्टरमध्ये संपर्काची तरतुद करता येईल. तसेच शेती व उद्योगांच्या प्रक्रिया केंद्रांत संपर्क स्थापन होईल. मुल्य श्रुखलेमुळे शेतकरी, कॉर्पोरेट, शासन व आर्थिक संस्था यांमध्ये सहभाग निर्माण होईल. तसेच कंत्राटी शेती व इतर व्यवस्था देखील तयार करता येतील.

५.७ गांभीर्याने असे म्हणावे लागेल की, तज्ञांच्या मतानुसार जिल्ह्यात एमआयडीसी क्षेत्र जास्त प्रमाणात निर्माण करावे लागेल. जिल्हा पातळीवर काही परस्पर छेदांचे मुद्दे आहेत उदा. ग्रामीण व शहरी औद्योगिकरण.

५.७.१ नवीन लघु उद्योजकांद्वारे करण्यात आलेले अर्ज मोठ्या प्रमाणात नामंजूर करण्यात आले तर काही प्रलंबित आहेत. तसेच अर्ज मंजूरी विभाग वास्तविक कर्ज वाटप विभागांत बरेच अंतर आहे. त्यामुळे नवीन उद्योजकांसाठी पोषक वातावरण नाही. कर्ज पत अजुनही अपुर्णावस्थेत असल्याने जिल्हाची स्थिती मागास आहे. स्थानिक लघु उद्योगांच्या म्हणण्यानुसार अजुनही इन्स्पेक्टर राज चालु आहे. यासाठी एक खिडकी योजना राबविणे आवश्यक असून लघु व मध्यम उद्योजकांना आवश्यक त्या सेवा त्वरीत मिळाल्या पाहिजेत.

५.७.२ जिल्ह्यात साक्षरतेचे प्रमाण देखील कमी आहे (७५.३ टक्के). तसेच लोकांचा अतिरेकी ग्रामीण शेतकी स्वभाव असल्याने ते स्वतःच अडचणी निर्माण करतात ज्याचा गुणवत्ता व उत्पादनावर परिणाम होतो.

५.७.३ सर्व लघु उद्योजकांनी कामगारांचे कामावर गैरहजर राहण्याचे प्रमाण जास्त आहे या गंभीर समस्येवर मतप्रदर्शन केले.

५.७.४ कुशल कामगारांची कमतरता मोठ्या अडचणी निर्माण करीत आहे. उपलब्ध कुशल कामगारवर्ग नेहमीच मुंबई, पुणे किंवा नाशिक याठिकाणी नोकरीच्या संधी शोधतो. कामगारवर्गाची गैरहजर राहण्याची सवय व अल्प कुशलता हे उद्योजकता विकासामधील फार मोठे अडथळे आहेत.

५.८ डीसीआय व एमसीईडी (महाराष्ट्र सेंटर फॉर एंटरप्रनशिप डेव्हलपमेन्ट) द्वारा जरी चांगला सहयोग मिळाला तरी ग्रामीण क्षेत्रातील उद्योजकांना काही अडचणीं येतातच. जसे बँका ग्रामीण भागातील उद्योगांना कर्ज देण्यास तयार नसतात, तसेच बँका जमिनीचे तारण किंवा सुरक्षा मागतात. जिल्ह्यात बऱ्याच प्रमाणात बेकार युवक असून त्यांच्याजवळ सहसंपत्ती तारण ठेवण्यास नसल्याने ते कर्ज प्राप्त करु शकत नाहीत.

५.९ याव्यतिरिक्त, काही क्षेत्रात त्वरीत विकास होणे आवश्यक आहे:

५.९.१ पायाभूत सुविधांचा विकास जसे दूरध्वनी संपर्क, हवाई सेवा, रेल्वे सेवा, रुग्णालये, शैक्षणिक सुविधा व मनोरंजन इ.

५.९.२ भौतिक पायाभुत सुविधांचा विकास जसे जल आपुर्ती, गोदामांची आवश्यकता व संचयन सुविधा, उर्जेचा सतत पुरवठा, विद्यात व मोटार उद्योगांची उभारणी, कॅप्टीव उर्जा सयंत्रांचे कार्यान्वयन.

**परिदृष्य निवेदन**

उद्योजकता विकासास उत्तेजन देण्यासाठी उत्पादन क्षेत्राचा विकास खाजगी क्षेत्रातील गुंतवणुकीने करण्यात यावा. तसेच जैव-तंत्रज्ञान पार्क, अकृषिक विकास व वैज्ञानिक प्रगती ही मूळ प्रतिस्पर्धात्मक क्षेत्रे आहेत.

| कार्यवाहीची व्यवस्था |
|---|
| **अ. कृषिजन्य औद्योगिकरण** |
| १. जैव-तंत्रज्ञान पार्कची स्थापना |
| २. शेती उत्पादनांची सहयोग क्षेत्रे उभारणी |
| ३. फार्मास्युटीकल संस्थांची उभारणी |
| ४. विज्ञान व तंत्रज्ञान खात्यामार्फत विज्ञान व तंत्रज्ञान उद्योजकता पार्क (एसटीईपी) तसेच संशोधन व विकासासाठी शैक्षणिक संस्थेची स्थापना |
| ५. कॉटन टेक्सटाईल पार्क / उर्जा माग, गिनींग, प्रेसिंग, स्पिनिंग गिरण्या |
| **ब. गुणवत्ता नियंत्रण** |
| १. आयएसओ मानके |
| २. स्थानिक बाजारासाठी व आंतरराष्ट्रीय खाद्य बाजारासाठी चांगले पॅकेजींग |
| ३. नियंत्रक चौकटीमधुन दृढीकरण |
| ४. मांस उत्पादन, चर्मोद्योग व कातडी कमावण्याच्या उद्योगांसाठी वेगळे भाग |
| ५. विविध केंद्रीय व राज्य योजना व मंत्रीमंडळ, खाते व एजन्सीजद्वारे अर्थपुरवठा |
| **क. कमाल पातळीवरील उद्योग संस्थांचा विकास** |
| १. एमआयडीसी पायाभुत सुविधांचा उपयोग व आधुनिकीकरण |
| २. कामगार वर्गाच्या गैरहजेरीचे प्रमाण कमी करणे |
| ३. वाहतुक व संचयनासाठी जमिनीची उपलब्धता |
| ४. उद्योग विकासासाठी पर्याप्त अनुदानाद्वारे कमी खर्चात उभारणी |
| ५. डीआयसी/ फॅक्टरी इन्स्पेक्टर यांच्यावर नियंत्रणास व मानके वापरण्यास उत्तेजन |
| ६. वार्षिक उद्योग मेळाव्यांचे आयोजन, ज्यामुळे अधिक गुंतवणुक होईल |
| **ड. मनुष्यबळाची उपलब्धता** |
| १. मनुष्यबळाच्या प्रशिक्षणासाठी उत्कृष्ट शैक्षणिक संस्था केंद्र |
| २. आयटीआय, पॉलिक्लिनिक्स, विद्यापीठे यांची संख्या संगमनेर, नेवासा, पाथर्डी, अहमदनगर, पारनेर, श्रीगोंदा येथे वाढविणे. |
| ३. मजूर बाजार माहिती व्यवस्थेमध्ये मजूरीच्या दरात वाढ |
| ४. स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण संस्था, तसेच स्त्रीया, युवक अ.जा./अ.ज. समुहांसाठी विशेष योजना |

५.७ भारत सरकारने तंत्रज्ञान उद्योजगता पार्क विविध राज्यात काढण्यासाठी विविध कार्यक्रम व योजना विविध मंत्रालयीन खात्यांमार्फत तयार केलेल्या आहेत. विज्ञान व तंत्रज्ञान खात्याने विज्ञान व तंत्रज्ञान उद्योजकता पार्कची योजना तयार केली असून त्यासाठी एक संशोधन व विकास शैक्षणिक संस्थेची स्थापना केली आहे. जैव तंत्रज्ञान खात्याने जैव तंत्रज्ञान पार्कची योजना[२] तयार केलेली असून महाराष्ट्र शासन औद्योगिक धोरण २००१ नुसार जैव तंत्रज्ञान पार्क तयार करणे, संशोधन व विकास केंद्र व मार्गदर्शन सयंत्र सुविधा तसेच कंत्राटी संशोधन करुन इक्वीटी भाग या प्रकल्पांत गुंतविण्याचे ठरविले आहे. राज्य शासनाने यांत विविध स्वरुपात भाग घेण्याचे ठरविले आहे, जसे प्रकल्पांसाठी जमीन उपलब्ध करुन देणे, जैव तंत्रज्ञान कृषि क्षेत्रात कार्यरत असलेल्या संस्थांस कृषि उद्योग म्हणून मान्यता देणे व त्यांचा विस्तार करणे तसेच त्यांना सर्व प्रकारचे अनुदान, सुट व फायदे देणे. तसेच एमआयडीसी द्वारे त्यांना औद्योगिक एकक उभारणीसाठी जमीन औद्योगिक क्षेत्रांत औद्योगिक दरांवर उपलब्ध करवुन देणे. आत्तापर्यंत महाराष्ट्रात जैव तंत्रज्ञान पार्क फक्त पुणे जिल्ह्यात आहे. कृषि विज्ञान केंद्र व कृषिविषयक उत्पादनांच्या वैविध्यतेमुळे अहमदनगर जिल्हा जैव तंत्रज्ञान विकासातील एक अग्रगण्य जिल्हा म्हणून नावारुपास येऊ शकतो.

५.८ बहुतेक कृषिविषयक उत्पादानांत वाढ झालेली आहे. तरीही त्यांचे निर्धारण औद्योगिक वापराचा कच्चा माल म्हणून करणे आवश्यक आहे, तसेच पिकाच्या गुणवत्तेत वाढ होणे आवश्यक आहे. काही सशक्त कृषिभूत उद्योग खालील प्रमाणे आहेत:

५.८.१ जिल्ह्यातील शेतकरी सध्या खाद्यान्न पिके घेत आहेत ज्यात ज्वारी, ऊस, सोयाबीन, डाळी, द्राक्षे व इतर बागवानी पिके येतात.

५.८.२ ज्वारी हे जिल्ह्यातील मुख्य पिक असून प्रक्रियेनंतर तिचे ४६३,६८० मेट्रीक टन इतके उत्पादन झाले आहे. त्यामुळे ग्लुकोज, स्टार्च, माल्ट बिअर व इथेनॉल यांची निर्मितीच्या संधी उपलब्ध आहेत. इथेनॉल हे मद्य उद्योग, रसायन उद्योग व रबर उद्योग आणि पेट्रोल उद्योगातील महत्त्वाचा कच्चा माल आहे.

५.८.३ जिल्ह्यात सध्या १७ ऊस गिरण्या कार्यरत असून त्यात जिल्ह्यातील पुष्कळ लोक कामावर आहेत. ह्या ऊसगिरण्या मळींची निर्मिती करतात, ज्याचा उपयोग उर्जा निर्मिती, कागद निर्मिती इ. क्षेत्रांत होतो. या मळींद्वारे ॲसीटोन व इथेनॉल देखील बनवता येते.

--------------------------

२ http://www.dst.gov.in/admin_finance/ls_१३/unsq४१२१.htm accessed on २३rd April २०११.

५.८.४ सोयाबीनची लागवड दिवसेंदिवस वाढत आहे. जरी सोयाबीनचे प्रक्रियाकेंद्र नसले (सोया दुध, डाएट जेवण, व तेल) तरीही जिल्ह्यात यासाठी प्रारंभिक पावले उचलता येतील.डाळ गिरण्यांची आस्थापना आधुनिक तंत्रज्ञान वापरुन केली पाहिजे. कारण जिल्ह्यात ७५३९२ मेट्रीक टन इतके डाळींचे उत्पादन झाले आहे. सुर्यफुल देखील जिल्ह्यातील एक मुख्य नगदी पिक असून त्याचे उत्पादन ७४९६० मेट्रीक टन इतके झाले आहे.

५.८.५ चिक्कु, आंबा, संत्री, पेरू ही फळे जिल्ह्यातील मुख्य पिके आहेत. मँगो पल्प बनवण्याचा उद्योग उभा करण्यास जिल्ह्यात चांगलाच वाव आहे. स्थानिक आंबे वापरुन लोणची, पल्प व रसोत्पादन युनिट उभारता येतील.

५.९ कापुस हे जिल्ह्यातील मुख्य पिक आहे. या आधारे जिल्ह्यात कापड उद्योग उभारता येऊ शकतो. कापड उद्योग उभारणीचा चांगला मार्ग म्हणजे एकत्रित कापड पार्कच्या मुळातुन मुल्य श्रृंखलेच्या मागे जाणे. कापड पार्क मुळे गिनींगद व प्रेसिंग स्पिनिंग गिरण्या देखील काढता येतील. पॉवरलुम्स व इतर अनुषांगित उद्योग उभे करता येतील.

५.१० जैव तंत्रज्ञान संस्थेच्या विकासामध्ये खालील मुद्दे येतातः

५.११.१ स्थानिक बाजार व आंतरराष्ट्रीय खाद्य प्रक्रिया बाजारात उत्कृष्ट पॅकेजींग. खाद्यानात कमी किंवा अजिबात इतर पदार्थ नसणे, व पॅकेजिंग तंत्रज्ञानामुळे खाद्यान्नची गुणवत्ता व सुरक्षितता यांची हमी राहते.

५.११.२ गुणवत्ता सुधारण व सुरक्षा मानकांची मिलन करताना किंमत वाढणार नाही यावर लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे. शासनाने लघु उद्योजकता पातळीवर गुणवत्ता विकासास सहाय्य केले पाहिजे. त्यासाठी नियंत्रक चौकटींच्या मानकांे निर्माण करुन चांगल्या उत्पादन सवयी (जीएमपी), हजर्ड अॅनालेसिस क्रिटीकल कंट्रोल पॉईन्ट (एचएसीसीपी, आयएसओ ९०००, गुड लॅब प्रॅक्टीसेस (जीएलपी), टोटल क्वालिटी मॅनेटमेन्ट (टीक्यूएम), फूड लेबलिंग, फूड पॅकेजिंग तंत्रज्ञान इ.

५.१२ कृषि व खाद्यान्न उद्योगात उच्च कौशल्यतेच्या कामगारवर्गाची व पर्यवेक्षक वर्गाची आवश्यकता असून, त्यांना स्वच्छतेच्या चांगल्या सवयी हव्यात. शेतकऱ्यांसाठी डीआयसीने शेती उत्पादनाचे प्रशिक्षण देऊन उत्पादनाची गुणवत्ता वाढविण्याचा प्रयत्न करावा. तसेच डीआयएस ने देखील उद्योजकता विकासाचे प्रशिक्षण आयोजित करावे.

५.१३ खाद्यान्न प्रक्रियेसाठी केंद्र सरकार व राज्य सरकारच्या बऱ्याच योजना असुन त्यांद्वारे बरेचसे आर्थिक व इतर सहकारी सहयोग उपलब्ध आहेत. परंतू, उद्योजकांना याबाबत काहीही माहिती नाही. मुल्य श्रृंखलेमध्ये त्यांना विविध एजन्सीजबरोबर विविध योजना राबवाव्या लागतात. यामुळेच या सर्व

योजना एकाच ठिकाणी आणणे सोईस्कर होईल. यासाठी डीआयसीने एक संपर्क समुहाची स्थापना करुन उत्कृष्ट सेवा देण्याचा प्रयत्न करावा.

५.१४ डीआयसीने स्वतः पुढाकार घेऊन कंत्राटी शेती सुरु करावी. ही शेतकरी व उद्योगातील एक महत्त्वाची संपर्क कडी आहे. डीआयसीने खाजगी गुंतवणुकदारांना उदा. रिलायन्स फ्रेश, स्पेन्सर यांना या योजनेच्या व्यापकतेमध्ये समाविष्ट करावे.

५.१५ कापड उद्योगासाठी जिल्ह्याने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा. डीआयसी देखील टेक्सटाईल पार्क योजनेस उत्तेजन देऊ शकते. तसेच यासाठी जिल्ह्यातील कापड उद्योगास पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी सहाय्य करावे.

५.१६ महाराष्ट्रातील या जिल्ह्यात सर्वात जास्त गुरे-ढोरे आहेत. एकूण गुरांची संख्या ४५ लाख आहे. पशु प्रजनन ही एक महत्त्वाची कौटुंबिक प्रक्रिया आहे. लघु व मध्यम उद्योजक जे मांस व चर्मोद्योगात कार्यरत आहेत त्यांना मांस व चर्माचे मोठ्या प्रमाणवर निर्यातीकरण करण्यासाठी मोठा वाव आहे. या समुहास आवश्यक ते विपणन सहाय्य केल्यास त्यांना अधिक किंमत मिळेल व या क्षेत्रात अधिक नोकऱ्या उपलब्ध होतील तसेच यात काम करणाऱ्या कामगारांस जास्त आवक प्राप्त होईल.

५.१७ अहमदनगर हा राज्यातील दुध उत्पादनातील एक अग्रगण्य जिल्हा आहे. तराही दुधामधील भेसळीबाबत जिल्ह्यात काही प्रमाणात चिंता व्यक्त केली जाते. जिल्ह्यात एकूण २८२२ नोंदणीकृत दुध सहकारी संघ आहेत. जिल्ह्यास दुधाचे स्वच्छ संकलन करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरण्याची आवश्यकता आहे. दुधाची गुणवत्ता फारशी चांगली नाही. तसेच दुग्ध उद्योग विखुरलेल्या स्वरुपात व असंघटीत आहे. बहुतेक एसएचजी या क्षेत्रात प्रभाविपणे सहभागी होऊ शकतात. त्यामुळे या क्षेत्रात खाजगी गुंतवणुकीस वाव आहे.

५.१८ सर्व जिल्हास्तरीय योजनांचे व्यवस्थापन जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) द्वारे करण्यात येते. यात पंतप्रधान सेवा निर्माण योजना, भांडवल योजना, जिल्हा उद्योग कर्ज योजना, उद्योजकता विकास प्रशिक्षण योजना व समुह प्रोत्साहन योजना २००७चा समावेश होतो.

> ५.१८.१पंतप्रधान रोजगार योजना (पीएमआरवाय) अंतर्गत सुशिक्षित बेकार युवकांस स्वयंरोजगाद्वारे हा उद्योग करता येईल. उद्योग सेवा व्हेंचरद्वारे रु.२ लाखांपर्यंत मदत मिळते व रु. १लाख रोख रक्कम पर्यंत व्यवसाय वाढ मिळते. ज्या उमेदवारांस सदर योजनेचा लाभ घ्यावयाचा आहे त्यांनी खालील बाबींची पुर्तता करणे आवश्यक ठरते. पुढील १० वर्षांचा विस्तार स्त्रीया/ अपंग/ स्वातंत्र्य सैनिक/ अ.जा. / अ.ज. साठी देण्यात येतो.) स्त्रीया/ अपंग/ अ.जा. / अ.ज. यांच्यासाठी योजनेमध्ये वयाची अट ४५ वर्षे इतकी ठेवण्यात आलेली आहे. जर उमेदवार केंद्र सरकारची इतर योजना राबविण्यास पात्र ठरला तर त्याला अनुदान मिळत नाही. २००२-०३ पासुन २००९-१०

पर्यंत या योजनेचे एकुण लाभधारक २११४ असून त्यांनी आत्तापर्यंत २०५३० सेवा निर्माण केल्या आहेत.

५.१८.२. उन्नत भांडवल योजना ही सुद्धा स्वयंरोजगार कार्यक्रमाचा भाग असून ज्या उमेदवारांनी सातवी पर्यंत शिक्षण पुर्ण केले आहे व जे १५ वर्षांपासून राज्याचे स्थानिक रहिवासी आहेत, त्यांना या योजनेचा लाभ घेता येतो. अशा उमेदवारांस रु.२५ लाखांपर्यंत कर्ज देण्यात येते व यातील १० टक्के रक्कम उमेदवारास स्वतः उभारावी लागते. बँकेतर्फे ७५ टक्के रक्कम दिली जाते व जिल्हा उद्योजकत केंद्राद्वारे १५ टक्के रक्कम मिळते. उमेदवारास कर्जाची परतफेड वार्षिक ६ टक्के व्याजाने करावी लागते. जिल्ह्यात या योजनेचे लाभ दरवर्षी सुमारे ३०-४५ लाभधारक घेतात. मागील आठ वर्षांत ७८२ स्वतंत्र व्यक्तींनी या योजनेचा लाभ घेतला व त्यांनी आतापर्यंत २०२८ नोकऱ्या निर्माण केल्या. बँक कर्ज व राज्य सरकार यावर १:५ या अनुपाताने खर्च करीत आहे. राज्य सरकारने स्वतःचा खर्च १:१.४ या प्रमाणात केलेला आहे.

५.१९ शेवटी, आजच्या प्रतिस्पर्धेच्या काळात, जिल्ह्याने शेजारील क्षेत्रांशी स्पर्धा करुन आपल्या क्षेत्रात उद्योजकता विकासासाठी जागा उपलब्ध आहे यांवर सतत प्रकाश टाकला पाहिजे. माहितीचा अभाव हे याचे मुख्य कारण आहे. या अनुषंगाने वार्षिक औद्योगिक मेळाव्याचे आयोजन केल्यास खाजगी क्षेत्रांतील गुंतवणुकदार आकर्षित होऊ शकतात. या बाबत चांगली सेवा देणे हा गुंतवणुकीच्या अटीवर मात करणारा मुद्दा ठरु शकतो. तसेच स्थानिक पातळीवर व क्षेत्रीय कार्यालयांचे औद्योगिक क्षेत्राबाबत सक्षमीकरण करणे आवश्यक आहे.

# ६. गरीबी व मानव विकास

**पुर्वपिठीका**

६.१ या क्षेत्रातील अर्थव्यवस्था व सामाजिक विकासास उचित आयाम देण्यासाठी या प्रक्रियेचा लोकांवर करण्याचा निहितार्थ आहे. मानव विकासाचा दृष्टिकोन हा अर्थव्यवस्थेचा विकास आणि मानवी स्वातंत्र्याचे विस्तार यांना केंद्रस्थानी ठेऊनच गांभीर्याने शोधावयाचा आहे. मानव विकास अहवाल १९९० नुसार मानवी विकासाची व्याख्या अशी करण्यात आलेली आहे की, *लोकांच्या आवडीच्या सीमांचे विस्तृतीकरण करण्याची प्रक्रिया.*

६.२ शिक्षण, आरोग्य, पोषण व उपजीविका उभारणी हे यातील मुख्य भाग आहेत. एकाच भागाचे उदात्तीकरण केल्यास समाधानकार निकाल मिळणार नाहीत. यासाठी या सर्व श्रुखंलांची ओळख व क्षमता करुन घेतली पाहिजे तसेच अल्पसंख्यांक आणि गरीबांवर मुख्यतः लक्ष केंद्रीत केले पाहिजे.अ.जा./अ.ज. समुहांवर विशेष लक्ष देणे हे यातील सर्वोच्च टोक आहे. जिल्हात होणारे आंतरजिल्हा स्थलांतर व जिल्ह्यांतर्गत स्थलांतर याची परिक्षा केली. जी.प. अहमदनगर यांच्या स्त्रीया व मुले कल्याण केंद्राने दिलेल्या सूचनांवर लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे. सर्वसमावेशक अशा स्वच्छता सुविधांचे कार्यक्रम क्षेत्रान्वये राबविणे व त्यांची तरतुद करणे आवश्यक आहे. तक्रारींची दखल पंचायती आणि युझर ग्रुपद्वारे देण्याते येते व त्यावर मुल्यांकन प्रक्रिया केली जाते. आर्थिक कार्यक्रमांचे पर्याप्त स्वरुप, संस्थात्मक चौकटींचे सक्षमीकरण व प्रयासांचा विस्तार सुधारणे हे या प्रस्तावाचे व परिदृष्य २०२० चे मुख्य स्वरुप आहे.

**परिदृष्य निवेदन**

सामाजिक एकात्मता, असमानता व गरीबी कमी करणे, समाजाचे सक्षमीकरणास उत्तेजन देणे हे मानवी विकासाचे कार्य असून लोकांचा सहभाग देखील एकत्रित विकास प्रक्रियेसाठी महत्त्वाचा ठरतो.

| कार्यवाहीची व्यवस्था |
|---|
| **अ. सामाजिक सेवांचे सक्षमीकरण** |
| १. बहुस्तरीय संस्थांची संख्या वाढविणे |
| २. एकत्रित शिक्षण पद्धती (पुर्व प्राथमिक ते माध्यमिक), पीएचसीचा विस्तार, आरोग्य सुरक्षा पद्धती उपयोग दर वाढविण्यासाठी |
| ३. एनआरएचएम, आयसीडीएस, एसएसए, जल आपुर्ती स्वच्छता सेवा वृद्धींगत करणे |
| ४. एनओएपीएस, एनएमबीएस, एससीपी, टीएसपी चे कार्यान्वयन |
| ५. अस्तिवात असलेल्या पद्धतींचे एकत्रिकरण |
| ६. स्थलांतरीत कुटुंबासाठी जिल्हा पातळी/ब्लॉक पातळीवर शाळा/सेवा पुरविणे |
| ७. बीपीएल योजनेचे कार्यान्वयन करणे |
| **ब. लिंग, अ.जा./अ.ज/ओबीसी/एनटी** |
| १. जिल्हा/गांव पातळीवर पर्यवेक्षण एजन्सीची स्थापना |
| २. आरसीएच योजनेचे कार्यान्वयन करुन लिंगभेदाचे प्रमाण कमी करणे |
| ३. जीपी समिती व युझर ग्रुप द्वारे मुलींचे लग्न, जन्मदर, मृत्युदर यांचे पर्यवेक्षण करणे |
| ४. अ.ज. असलेल्य ब्लॉकमध्ये होस्टेल सुविधा पुरविणे |

५. खेळ, कला व सांस्कृतिक संस्थांची स्थापना करुन विविध समुहांचा एकत्रित विकास करणे

**क. पुरवठा गुणवत्तेमध्ये सुधारणा**

१. प्रशिक्षण व स्त्रोत केंद्रांची स्थापना
२. बीआरसी व सीआरसी यांच्या गुणवत्तेत सुधारणा करणे व वैयक्तिक शिक्षणास उत्तेजन देणे
३. शैक्षणिक गुणवत्ता सुधारणए तसेच आरोग्यविषयक सेवांची उपलब्धता मानवीउर्जेस करुन देणे
४. गांव/केंद्रात डॉक्टर्स, एएनएम, एडब्ल्यु सेविका यांच्या सतत उपलब्धतेबाबत सुनिश्चितता करणे.

**संबंधित व भविष्यकालीन हस्तक्षेपातील क्षेत्र**

६.३ अहमदनगर मधील एकूण लोकसंख्येपैकी २५.०४ लोक गरीबीरेषेखाली जगत आहेत. शेतकरी तसेच मजूरांच्या राहणीमान अतिशय खालच्या पातळीवर आहे. विकासाच्या बाबतीत उत्तर व दक्षिण अशी विभागणी होते. कर्जत व श्रीगोंदा विभाग अतिशय कमी विकसीत भाग असून तेथे सुपीक जमीनीची वानवा आहे. उत्तर भागात असलेल्या नद्यांमुळे हा परिसर शेतीप्रधान आहे व तेथील लोकांचे राहणीमान चांगले आहे. दक्षिण जिल्हा दुष्काळ प्रवण असून या भागावर पर्यायी मुल्ये, संबंधित कार्यावर लक्ष देणे आवश्यक आहे.

६.४ अकोले व संगमनेर भागात अ.ज. संख्या जास्त असून त्यांचे एकूण लोकसंख्येतील प्रमाण अनुक्रमे ४५.५९ टक्के व ९.३६ टक्के आहे. अकोले व संगमनेर सर्वात जास्त गरीब भाग असून या भागातील अ.ज. लोकसंख्या जास्त असल्या कारणाने हा भाग मागास राहीला आहे. अकोले भागात सर्वात जास्त गरीबीरेषेखालील लोकसंख्या राहते. कर्जत भागास देखील जिल्ह्यातुन काहीही फायदा होत नाही.

६.५ अहमदनगर जिल्ह्यात दोन्ही स्वरुपात म्हणजेत आंतरजिल्हा व जिल्ह्यांतर्गत स्थलांतरे होतात. जास्त स्थलांतरे ऊस उद्योगामुळे होतात. काही कुटुंबिय उसतोडणी कामगार म्हणून व काही विटभट्टी कामगार म्हणून नियमित हंगामी स्थलांतर करतात.

६.५.१ कुटुंबांच्या हंगामी स्थलांतराचा मुलांच्या शिक्षणावर गंभीर परिणाम होतो. बरीच स्थलांतरीत कुटुंबे आपल्या मुलांश शाळेत पाठवत नाहीत वा त्यांना शाळेत पाठवण्याच्या कोणत्याही योजना आखत नाहीत. जिल्ह्याचा अवधारणा दर ९४०७ इतका आहे. व्यापक प्रमाणाच्या हंगामी स्थलांतरणामुळे मुलांच्या शैक्षणिक गुणवत्तेत व अवधारणा दरात किमान पातळी आलेली आहे. चालु वर्षी १३७६ विद्यार्थ्यांनी आपल्या कुटुंबियांसोबत हंगामी स्थलांतर केले आहे. वय वर्षे ६ ते १४ असलेल्या विद्यार्थ्यांच्या एकूण कुटुंबियांची संख्या सुमारे ४४०० इतकी आहे.

६.५.२ स्थलांतरीत विद्यार्थ्यांसाठी साक्षरशाळांची स्थापना करण्यात येऊन अशा शाळांत स्थलांतरीत विद्यार्थ्यांस थेट प्रवेश दिला जातो. सद्यःस्थितीत साक्षरशाळा बंद पजलेल्या आहेत व त्या जि.प. शैक्षणिक खात्याने बंद केल्या आहेत.

६.५.३ ज्या विद्यार्थ्यांनी आपल्या कुटुंबियांसोबत हंगामी स्थलांतर केले आहे अशा सुमारे १३०० विद्यार्थ्यांना वसतिगृहाची सोय करुन देणे आवश्यक आहे. शाळेतील विद्यार्थ्यांचे स्थलांतर थांबविण्यासाठी व त्यांना शाळेत येण्यासाठी स्थानिक रहिवाश्यांची मदत घेऊन पर्यायी हंगामी वसतिगृहांची स्थापना करणे आवश्यक आहे.

६.६ अहमदनगर जिल्ह्याचा साक्षरता दर ७५.३० टक्के इतका आहे. (राज्यात १६वा). तसेच उपलब्धतांमध्ये लिंगात्मक असमानता आहेत. ग्रामीण क्षेत्रातील साक्षरता दर ७२.९२ टक्के असून शहरी क्षेत्रात ८४.६८ इतका साक्षरता दर आहे. प्राथमिक शिक्षणातील गळतीचे प्रमाण २२.५ टक्के असून उच्च प्राथमिक स्तरावर गळतीचे प्रमाण ७.७ टक्के आहे. संगमनेर, पारनेर व शेवगांव मध्ये गळतीचे प्रमाण (वय समुह ६-११ वर्षे) जास्त असून, श्रीगोंदा, शेवगांव, संगमनेर तालुक्यांत (वय समुह ११-१४ वर्षे) जास्त होते. एकूण अ.जा.च्या ९७०६५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला, अ.ज.च्या एकूण ७२५३४.४९२ प्रवेश घेतला असून ५वी इयत्तेसाठी १ कि.मी. त्रिज्येपर्यंत पर्यंत पायपीट करावी लागते. ८४ विभागांत आठवीच्या पुढील शाळा शिकण्यासाठी ३ कि.मी. त्रिज्येपर्यंत पायपीट करावी लागते.

६.७ ज्या भागावर विशेष लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे तो भाग म्हणजे पायाभूत सुविधांची निर्मिती करून गुणवत्तापुर्ण शिक्षण देण्यासाठी उपाययोजना आखणे हा होय. (एनजीओ, शासकीय संपर्क यांचे उपाय-प्रथम), शिक्षकांची उपलब्धता व शिकवण्याची गुणवत्ता, प्रवेशाच्या अडचणी. यासाठी जि.प. शाळांचे नियंत्रण/पर्यवेक्षण/मुल्यांकन करण्याची गरज आहे. तसेच स्थलांतरीत शाळा, शाळांच्या इमारतींची उभारणी, संडास (विशेषतः मुलींसाठी), स्वच्छ पिण्याचे पाणी, शिकवण्याच्या पद्धती/तंत्रज्ञान, अन्न सुरक्षा या मुख्य सुविधा, संरक्षक भिंती, विद्युतीकरण इ. वैयक्तिक/ सामुहिक विकास (प्रशिक्षित शिक्षकवर्ग), इंटरॅक्टीव प्रगती, स्थानिक रहिवाश्यांचा सहभाग व प्रदर्शन, धार्मिक प्रगती ज्यामुळे अ.जा., अ.ज., अल्पसंख्यांक, मुली यांची प्रगती होईल. काही विवक्षित बाबी व सूचना जसे लोकांचा सहभाग व जागरुकता, व्यवसाय मार्गदर्शन व निर्देशन केंद्रे, कंप्युटर शिक्षण केंद्रे ही भिरवाडी-अकोले येथील आदर्श शाळा आहे.

६.८ लोकांचा हस्तक्षेप व सामाजिक समुहांचा सहभाग हा अत्यंत अहमदनगर जिल्ह्याचा महत्त्वाचा भाग आहे. अहमदनगर जिल्ह्याची एकूण लोकसंख्या सुमारे ४०,४०,६४२ इतकी असून अनुसुचित जातींची लोकसंख्या ४,८४,६८५ (१२.०० टक्के) व अनुसुचित जमातींची लोकसंख्या ३,०३,२५५ (७.५१ टक्के) इतकी आहे.

६.९ अहमदनगर जिल्ह्यातील सामाजिक न्यायाच्या वास्तवतांमध्ये खालील गोष्टींचा अंतर्भाव होतो:

६.९.१ प्रतिस्पर्धात्मक परीक्षा मार्गदर्शन केंद्रांची पायाभूत सुविधा सर्व शासकीय वसतिगृहांत देण्यात यावी व ब्लॉक स्तरांवर मार्गदर्शन केंद्रे स्थापन करुन कल्याणकारी योजनांची माहिती पुरवावी.

६.९.२ पुढील प्रगती म्हणजे डिजीटायझेशन/ संगणकीकरण करुन संगणकीकृत स्कॉलरशीप योना शाळा व महाविद्यालय स्तरांवर राबविणे. कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण-स्वाभिमान योजनेअंतर्गत कृषिविषयक प्रशिक्षण देणे व अंतिमतः नोकऱ्यांची निर्मिती करणे. तसेच सहकारी संस्थांचे ब्लॉक स्तरावर सुविधा निर्माण करुन अ.जा. व अ.ज.साठी नोकऱ्या उपलब्ध करुन देणे.

६.१० जनसंख्येतील एक महत्त्वाचा भाग म्हणजे लिंग अनुपातमधील स्तरांचा असमतोलपणा. लिंगीय असमानता फारच मोठी असून त्याचे प्रमाण ०-५ असे आहे. त्यासाठी आरोग्य व पोषण बाबींवर लक्ष केंद्रीत करावे लागेल.

६.११ जिल्ह्यातील मुलांमध्ये कृमीरोग, खोकला, सर्दी, त्वचारोग, ॲनिमिया, बहुविध विटामीनचा अभाव इ. रोगांचे प्रमाण जास्त आहे. प्रौढ व्यक्तींमध्ये हृदयरोगाचे प्रमाण जास्त आहे. जिल्ह्यात १ सार्वजनिक रुग्णालय, २ उप रुग्णालये, २३ ग्रामीण रुग्णालये असून, ९६ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ५५५ उप आरोग्य केंद्रे आहेत. पीएचसी मध्ये सरासरी ४५ प्रसव होतात व माहितीचे प्रमाण १० मध्ये ६ असे आहे.

६.१२ माता व बालकांचे पालनपोषण हा मोठा मुद्दा आहे. बालविवाह प्रतिबंधक कायद्याची काटेकोर अंमलबजावणी, समाजात पुरुष व स्त्री समानता राखणे, आरोग्य प्रशिक्षणाच्या प्राथमिक सुविधांचे सक्षमीकरण. जास्त करुन पुरुष व स्त्री यांच्या अनुपातात समानता आणणे जरुरीचे आहे. तसेच शासकीय रुग्णालयात सुरक्षित प्रसव, ग्रामीण भागात तज्ञ डॉक्टरांची उपलब्धता, गांव ते शासकीय रुग्णालय थेट रुग्णवाहिका सेवा, माता व बालकांचे १०० टक्के लसीकरण, हृदयरोपण, मेंदू व किडनी रोपण इ. सेवा जिल्हा रुग्णालयात मिळाल्या पाहिजेत, संपर्कयोग्य व संपर्कहीनांसाठी कायम उपचार मिळाले पाहिजेत व आणीबाणीच्या परिस्थितीत त्वरीत वैद्यकिय सेवा उपलब्ध करुन देण्यात यावी.

६.१३ महिला व बालविकास कल्याण कार्यक्रमात किशोरवयीन मुलींचे सक्षमीकरण, ॲनिमियावर नियंत्रण, गर्भार व ओल्या बाळंतीणींचे सक्षमीकरण, आयसीडीएस केंद्रांत पुरवठ्याच्या पायाभूत सुविधा, अंगणवाडी सेविकांचे प्रशिक्षण इ. द्वारे सामाजिक जागरुकता आणणे.

६.१४ काही महत्त्वाच्या क्षेत्रात लक्ष देणे आवश्यक आहे, जसे प्रत्येक बाळंतीणीची पीएचसी मध्ये आवश्यक नोंदणी, त्यांच्ये हिमोग्लोबीन, किशोरवयीन मुलींच्या रक्तातील लोहप्रमाण चाचणी नियमित करण्यात आली पाहिजे. मुलांना कृमीरोगावर नियमित उपचार दिले पाहिजेत. जन्मदर व मृत्युदर कमी करणे, एचआयव्ही बद्दल जागरुकता तसेच कुष्ठरोग, कडेगाव व सावडे गांवात कमीत कमी २ प्रसुतीगृहे बांधणे.

६.१५ स्वच्छ पाण्याचा पुरवठा व स्वच्छता सुविधा देणे. लाईन खाते, पंचायती, मासन्स, ग्रामीण स्तरावरील समित्या यांच्यात समन्वय स्थापन करणे, स्वयं सहाय्यता समुह, एनजीओ यांची स्वच्छता सेवा पुरविण्यासाठी उपलब्धता. जिल्हा स्तरावर स्वच्छता व जल समितीची भूमिका, ग्रामीण स्वच्छता वाढविण्यासाठी सार्वजनिक-खाजगी-समहु स्तरांवर भागीदारी इ.

# ७. पर्यटन विकास

**पुर्वपिठीका**

७.१ या सेवाक्षेत्रात लोक आपल्याला असलेली माहिती दुसऱ्यांस देतात. यामुळे उत्पादकता, प्रदर्शन, संभावना व स्थिरतेत प्रगती होते. बहुतेक सेवा क्षेत्रांत कौशल्याची गरज असून त्यामानाने पर्यटन क्षेत्रात आरोग्य काळजी, आर्थिक, कायदेशीर, शैक्षणिक इ. पेक्षा कमी कौशल्य व ज्ञान असले तरी चालते. पर्यटन विभागात फार एकत्रता असून यात बऱ्याच क्षेत्रातील व पर्यटन क्षेत्रांतील कार्यांचा समावेश होतो ज्यांच्या सीमा पार व उद्योगपार असतात. सेवाक्षेत्रातील विस्ताराचे पर्यटन हे एक उत्तम उपकरण असून अहमदनगर जिल्हा सांस्कृतिक दृष्ट्या समृद्ध आहे. त्यामुळे परिदृष्य २०२० मधील समग्र सेवांत त्याचा समावेश करण्यात आला आहे.

७.२ या अध्यायात अहमदनगर मधील पर्यटन सेवेचा एकत्रित विकासांतर्गत समावेश करण्यात आला आहे. अहमदनगरमधील पर्यटन स्थाने विखुरलेली नसुन ती एकाच भागात केंद्रीत झाली आहेत. यातील महत्त्वाची धार्मिक व पर्यटन स्थाने अकोले व पाथर्डी क्षेत्रांत आहेत. अहमदनगर मधील पर्यटन विकासाचे दोन पैलु आहेत व त्यांवर एकाच वेळी प्रक्रिया करणे आवश्यक आहे. ती म्हणजे i) सद्याच्या विकास कार्यक्रमाचे सक्षमीकरण (शासनाने यासाठी आधीच पावले उचलली आहेत) ज्यात पायाभूत सुविधांची तरतुद करुन त्यांवर प्रक्रिया करणे व ii) नवीन पर्यटन स्थळांचा विकास.

७.३ अहमदनगर मधील पर्यटन स्थळांचे वर्गीकरण चार स्तरांत करता येईल. उदा. धार्मिक स्थळे, नैसर्गिक स्थळे, प्राचीन स्थळे व ग्रामीण कृषि-पर्यटन स्थळे. गावांच्या भोवतालचा परिसर विकसीत करुन त्यांचे नैसर्गिक पर्यटन स्थळांत रुपांतर करणे जसे भंडारदरा, कळसुबाई, हरिश्चंद्रगड वन्यजीवन संरक्षण क्षेत्र व मुळा धरण इ. यासाठी कार्यक्रमाची आधीच सुरवात केलेली आहे. गावांच्या भोवतालचा परिसर सुंदर असून त्यांत डोंगर, धबधबे व छोटे तलाव असून पर्यटनाच्या दृष्टिकोनातून त्यांना आकर्षक करता येईल व त्यांना ग्रामीण समुह व्यवस्थापनाद्वारे उत्पन्नाचे अतिरिक्त साधन म्हणून वापरता येईल. यासाठी त्रिस्तरीय विकास कार्यक्रमाची योजना आखण्यात आलेली आहे. म्हणजेच अहमदनगर किल्ल्याचे संवर्धन, भूनिर्माण व सौंदर्यीकरण आधीच सुरु करण्यात आले आहे.

**परिदृष्य निवेदन**

बहुविध सांस्कृतिक केंद्र उभारण्यासाठी पर्यटनास पर्यायी डोंगर विकास, आदीवासी जमाती, ग्रामीण पर्यटन व धार्मिक केंद्रे यांचे मानवसमुहांसाठी पर्यटन म्हणून विकास करता येईल.

| कार्यवाहीची व्यवस्था |
| --- |
| **अ. पर्यटन स्थल विकास** |
| १. जिल्हा पर्यटन विकास प्राधिकरण (डीटीडीए) |
| २. धार्मिक पर्यटनः शिर्डी एक धार्मिक स्थळाचे राष्ट्रीय स्मारक म्हणून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील पर्यटनस्थल करण्यात येईल. |
| ३. मानव मेळा योजना परिचयः भौतिक सुविधा व श्रमशक्तीने जिल्ह्यात धार्मिक स्थळांस भेट देणाऱ्या भाविकांना सेवा करता येईल. |
| ४. इको-पर्यटनः मुळा धरणाजवळील पक्षी वने, भंडारदरा धरणाचा हिल स्टेशन म्हणून विकास, अकोले, कळसुबाई, हरिश्चंद्रगड वन्य जीवन अरण्य. |
| ५. नागरी व ग्रामीण पर्यटनः राळेगणसिद्धी व हिरवे बाजार, एनपी मध्ये मनोरंजन पार्क, बगीचे, स्मारके व वस्तुसंग्रहालये. |
| **ब. खाजगी क्षेत्रातील गुंतवणुकीचे सक्षमीकरण** |
| १. हॉटेल व हॉस्पीटॅलीटी उद्योग |
| २. राष्ट्रीय स्तरावर हॉटेल उद्योगाचे मानकीकरण |
| ३. रिसॉर्ट व गेस्टहाऊस सुविधा खाजगी पर्यटनांतर्गत पुरविणे |
| ४. विविध ब्लॉक्स मध्ये पर्यटनविष्यक प्रदर्शने भरविणे |
| ५. पर्यटन स्थळांच्या जाहीरातांसाठी आयसीटी व आयटी सुविधांची तरतुद करणे. |
| **क. श्रमशक्ती विकास व प्रशिक्षण संस्था** |
| १. हॉटेल व हॉस्पिटॅलीटी व्यवस्थापन संस्था |
| २. स्वतंत्र व्यक्तींच्या पर्यटन प्रशिक्षणासाठी ब्लॉक स्तरीय संस्था |
| ३. मार्गदर्शक व सेवा निर्मितीसाठी व नोंदणीसाठी डीटीडीए सुविधा |
| ४. युवकांसाठी हॉटेल व्यवस्थापन व कॅटरींग व्यवस्थापन कार्यक्रम |
| ५. पॅकेज कार्यक्रमांचे पर्यवेक्षण करण्यासाठी डीटीडीए कार्यान्वयन |

# ८. विकेंद्रीकरण, सुशासन व सूक्ष्म स्तरीय नियोजन

८.१.१ धोरणांचा आराखडा तयार करून त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी शासन ही महत्त्वपुर्ण बाब आहे. सद्या केंद्रीय व राज्य शासनाकडून मिळणारी अनुदाने कमी झाल्याने स्थानिक स्वायत्त संस्थांच्या आरेखन धोरणांवर परिणाम झाला आहे. विविध कार्यक्रमांची संघटनात्मक संरचना लागू करण्यासाठी स्थानिक पातळीवरील विकासाचा काहीही संबंध नाही. प्रशासकीय अधिकारांचे फार थोड्या प्रमाणात स्थानिक पातळीवर हस्तांतरण झालेले आहे व त्यांचे नियंत्रण राज्य शासन करते. तसेच कार्यक्रमांचा भरमसाठपणा परंतू कार्यक्रमाची अगम्यता यांमुळे लक्ष्य समुहांवर त्यांचे कार्यान्वयन होत नसून काहीही उत्पादन हाती येत नाही. विविध खात्यांची ठिकाणे व त्यांच्या कार्यक्रमांबद्दल आंतरखातीय समन्वयाचा अभाव असल्याने आखलेल्या कार्यक्रमांचा पार बोजवारा उडतो. त्यामुळे लोकाभीमूख विकास कार्यक्रमांसाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे.

८.१.२ नियोजन प्रक्रियेत स्थानिक लोकांना डावलण्यात येते. तसेच जिल्हा स्तरावरील नियोजनानत स्थानिक लोक व शासकीय कर्मचाऱ्यांत सुरळीत संवाद साधला जात नाही. तसेच सहस्त्र लक्ष्यांच्या प्रक्रिया पार पाडण्यासाठी नागरी व ग्रामीण भागात काही विसंवाद असून त्यातुन काहीच निष्पन्न होत नाही. राज्याद्वारे जोर देऊन अतिजास्त प्रमाणात केलेले कार्यक्रम व धोरणांमुळे राज्य शासनाचे अशा कार्यक्रमांवर प्रशासकीय नियंत्रण राहते.

८.१.३ स्थानिक प्राधिकरणांचे व ग्रामपंचायचतींचे सक्षमीकरण करुन सत्तेचे विकेंद्रीकरण करणे आवश्यक आहे. आत्तापर्यंत फक्त ६५० ग्रामपंचायतींची स्वतःची कार्यालये असून धोरणे ठरवली जातात. १२६९ गावांचे ब्लॉक प्रमाणे महसुली व खर्चाच्या पटावर विश्लेषण करुन पाहिले असता असे ठळकपणे दिसून आले की, काही बाबतीत लोकांचा हस्तक्षेप महत्त्वाचा आहे. महसूलाचे आयकर (गृह, जल व इतर) इतर स्त्रोतांच्या व खर्चाच्या अनुमानीत अंदाजानुसार सर्वसाधारण, शैक्षणिक, सार्वजनिक आरोग्य व जल आपुर्ती, स्वच्छता सुविधांवर शासन अनुदान व मान्यता देते. याची पातळी एकट्या अकोले गांवात रु.३७.३७ लक्ष असून रु.१०२५२.८० लक्ष पारनेर ब्लॉकवर खर्च केले गेले. विविध गावांच्या उत्पन्न व खर्चाची तपासणी केली असता असे निदर्शनास आले की काही ठिकाणी आर्थिक स्त्रौतांचा उपयोग करणे आवश्यक आहे. बहुतेक ग्रामपंचायतींचा महसूल शासकीय अनुदाने व मान्यता द्वारे होतो व खर्चा प्रामुख्याने सर्वसाधारण खर्च व जलआपुर्ती आणि स्वच्छता सुविधेवर होतो.

८.१.४ राजीव गांधी यांचे प्रसिद्ध कथन आहे की, शासनाने दिलेल्या १०० पैशांपैकी फक्त १५ पैसेच गरीबांपर्यंत पोहचतात व ही बाब सद्या केलेल्या विविध पातळींवरील अभ्यासानुसार खरी आहे असे स्पष्ट झाले. नियोजन कमीशनने सन २००५ साली केलेल्या अभ्यासानुसार सरकारने सार्वजनिक वितरण व्यवस्थेस दिलेल्या एका रुपयातील फक्त २७ पैसे गरीबांपर्यंत पोहचतात.

**परिदृष्य निवेदन**

राजकोषीय व लोकशाही पद्धतीचे विकेंद्रीकरणाची प्रक्रिया अधिक खोलवर करण्यासाठी जिल्ह्याचे विकेंद्रीकरण करणे आवश्यक आहे. यासाठी राजकीय आश्वासनांद्वारे लोकांच्या भरभराटीचा उचित मार्ग नियोजित करता येईल.

| कार्यवाहीची व्यवस्था |
|---|
| **अ. राजकोषीय विकेंद्रीकरण** |
| १. जिल्हा परिषदां (जिल्हा नियोजन समिती) व ग्रामपंचायचतींच्या राजकोषीय स्थितीचे सक्षमीकरण करणे. |
| २. जीपी/एनपी मध्ये स्त्रोतांच्या वाटपांतील असमानता दूर करणे. |
| ३. वास्तविक योजनांचे कार्यान्वयन करणे व स्त्रोतांच्या लवचिकतेत सुधारणा करणे. |
| ४. जि.प.च्या महसूल व खर्चासंबंधी उत्तरदायित्वांमध्ये वाढ करणे |
| ५. नियोजन व्यवस्थेचे गांव व ब्लॉक पातळीवर संस्थापन करणे |
| ६. जिल्हा माहिती व्यवस्था स्थापन करणे |
| ७. ई-गव्हर्नन्सचा वापर करुन जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती जोडणे |
| **ब. लोकतांत्रिक विकेंद्रीकरण** |
| १. जन नियोजनासाठी जी.प. एन.पी. यांचे सक्षमीकरण |
| २. निर्वाचित प्रतिनिधींसाठी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन |
| ३. सूक्ष्म स्तरीय नियोजन व शासनाचे कार्यान्वयन |
| ४. जी.प. एन.पी. मध्ये उपलब्ध असलेल्या सर्व स्त्रोतांबाबत सातत्याने जागरुकता कार्यक्रम राबविणे |
| ५. सामाजिक लेखापरीक्षणाच्या पारदर्शकतेसाठी ग्रामसभांचे आयोजन करणे |
| **क. जन सहभाग** |
| १. कार्यक्रमांचे नियोजन व कार्यान्वयन करण्यासाठी सर्व नागरी संस्था, व भागधारकांचा सहभाग |
| २. लिंग समानता व सामाजिक प्रतिनिधित्वासाठी समित्यांची सुनिश्चिती करणे |
| ३. जिल्हा माहिती अधिकाऱ्यांनी माहितीच्या अधिकाराचे कार्यान्वयन करावे व शासनामध्ये पारदर्शकता ठेवावी. |

**भविष्यकालीन हस्तक्षेपीय क्षेत्र**

८.२ सद्या, जिल्हा स्तरांवरील विकास कार्यक्रम जिल्हाधिकारी, जिल्हा नियोजन समिती व जिल्हा परिषदांच्या अखत्यारीत येतात. आदीवासी भागात अतिरिक्त शासन व्यवस्था असून एकत्रित आदीवासी विकास कार्यक्रमाचा (आयटीडीपी) त्यात समावेश होतो. या विविध संरचनांमुळे समन्वय व सहयोगाचा अभाव होतो. यासाठी जिल्हा नियोजन समिती बळकट करणे आवश्यक आहे कारण जिल्हा नियोजन अधिकारी (डीसीपी-डीपीओ) हा सर्व खात्यांवरील प्रमुख असुन विविध पातळीवरील शासन चालविणे त्याचे काम आहे. सहकार्याच्या माध्यमातून गाव, ब्लॉक व जिल्हा पातळीवरील शासनामध्ये असलेल्या मोकळ्या भागांवर मात करता येईल. डीसीपी-डीपीओ चे मुख्य लक्ष्य हे सह्स्त्र विकास योजनेंचे लक्ष्य कह्यात ठेवुन इतर बाबतीत जोडता येईल जे ११व्या नियोजन उद्देशांत सांगितले आहेत:

* गरीबी व उपासमारीचे समूळ उच्चाटन
* सर्वसमावेशक प्राथमिक शिक्षण
* लिंग समानतेचा प्रसार व स्त्रीयांचे सक्षमीकरण
* बाल मृत्युदराचे प्रमाण कमी करणे

* एचआयव्ही/एड्स, मलेरिया व इतर घातक रोगांविरुध्द लढा
* पर्यावरण स्थिरतेची हमी

तालुका स्तरावर लक्ष्यांच्या प्राथमिकतेमध्ये फरक होऊ शकतो.

८.३ डीसीपी-डीपीओ यांचे लक्ष्य म्हणजे कार्यान्वयन, सामाजिक सेवांची गुणवत्ता व उपयुक्तता, तसेच ज्या लोकांची समाजातील व आर्थिक स्थिती खालावलेली आहे, व जे आदीवासी पृथकपणे राहतात त्यांना सामाजिक सेवा गुणवत्तापुर्ण व उपयुक्तरित्या पुरविणे. स्त्रीयांबाबत विशेष कार्यावर जोर देणे आवश्यक आहे. शासकीय संरचना उदा डीपीसी-डीपीओ यांच्या अंतर्निहीत परिचय म्हणडे आंतरीक/बाह्य क्षेत्रातील लोकांसाठी नियोजनाचे कार्यान्वयन करुन त्यांच्या सहयोगाने मानव विकास धोरणे व सेवा पुरविणे हा होय.

८.३.१ डीसीपी-डीपीओ याने राज्य मानव विकास कोश (एसएचडीसी) यांना स्वतः अहवाल देऊन् सामाजिक-आर्थिक धोरणांची सूत्रीकरण केले पाहिजे. ओलीताखालील क्षेत्रे, गरीबी हटाव कार्यक्रम, सामाजिक सुरक्षितता, शैक्षणिक कार्यक्रम, आरोग्य व पोषण कार्यक्रम व प्रशिक्षण निदेशालय यांचे नियोजन समितीने विशेष नियोजन करणे आवश्यक आहे.

८.३.२ डीपीसी-डीपीओ यांचे अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी असतील. कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अध्यक्ष, ईजीएस उपजिल्हाधिकारी, उप कार्यकारी अधिकारी, शिक्षण, आरोग्य व पोषण व इतर हे मुख्य सभासद असतील. जिल्हा परिषदेचे सदस्य निवडक बाबींच्या कार्यान्वयनासाठी घेतले जातील. या समितींतर्फे मानव विकास कार्यक्रम विविध पातळ्यांवर पंचायतींच्या समन्वय समितींद्वारे कार्यान्वित करण्यात येतील.

८.३.३ डीपीसी-डीपीओ हे पंचायत पद्धतीमधील एक भाग असतील व इतर सामुहिक पातळीवरील निर्णय जिल्हाधिकारी व महसूल विभागातील अधिकारी घेतील.

४.३ आंतर क्षेत्रीय समन्वयाचे समिती स्तरीय सुनिश्चयन करण्यात येईल. येथे अधिक समजावण्याची आवश्यकता नाही की, कार्यक्रमाची अंमलबजावणी सर्वोच्च असेल जरी ते मानव विकास क्षेत्र किंवा इतर कुठलेही क्षेत्र असुदे. काही प्रकरणांत आंतर क्षेत्रीय समन्वयाच्या बाबींत सामुदायिक संस्था खालील प्रमाणे निर्णय विचार विनिमय करुन घेऊ शकतातः

४.३.१ ओलीत जमीन व्यवस्थापनः सद्या ओलीताखालील जमिनीवर विविध एजन्सी, पद्धती व प्रकल्प पद्धतींचे कार्यान्वयन सुरु आहे. तसेच पुर्वीच्या अनुभवानुसार विविध एजन्सीमधील समन्वय अजुनपर्यंत झालेला नाही. प्रस्तुत अहवालात एक समान पद्धतीचा प्रस्ताव दिलेला असून त्यानुसार ओलीताखालील जमिनीवर कार्यान्वयन करावे. जसे आयजीएसएसएस-नाबार्ड मॉडेल. यात ग्रामीण वॉटरशेड समितीचा समावेश आहे. त्याचप्रमाणे एनजीओच्या सुविधा देखील घेता येतील. अंतिम

उत्तरदायित्त्व जिल्हा परिषदेवर व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यावर सोपवावे. यातील प्रमुख सुवीधा एजन्सी ही मृत्तीका संवर्धन खाते असेल जे जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत कार्य करतील. तसेच याच्या निधी संकलनासाठी (जसे दुष्काळ प्रवण क्षेत्र कार्यक्रम) जिल्हा परिषदेतर्फे वरील निर्देशांनुसारच राबविण्यात यावा. जिल्हा परिषदेने खात्री करावी की, ग्रामपंचायत व व्हीडब्ल्युसी यांची स्थापना होऊन ते ओलीताखालील जमीनीच्या कार्यक्रमाचे कार्यान्वयन करतील. *या कार्यान्वयनासाठी इतर कोणत्याही समित्या किंवा एकापेक्षा जास्त समित्या स्थापन करु नयेत.*

४.३.२ लघु पाटबंधारे: राज्यात लघु पाटबंधाऱ्यांचे काम मोठ्या प्रमाणात पुर्ण होत आहे. आत्तापर्यंत आलेल्या अनुभवानुसार एकरेषीय उत्तरदायित्वाचा अभाव, लघु जल प्रकल्पांचे उपयोग समाधानकारकपणे करण्यात आलेले नाहीत. त्याचप्रमाणे ईजीएसच्या जवाहर विहिर योजनें अंतर्गत पाटबंधारे विहिरींचे खनन पत सुविधेच्या अभावामुळे व अप्रभावी कार्यान्वयनामुळे पुर्ण झालेले नाही. या अपुर्ण प्रकल्पांवर लक्ष केंद्रीत केले पाहिजे. या अनुषंगाने जिल्हा स्तरावरील लघु पाटबंधारे खात्याचे सक्षमीकरण करणे आवश्यक आहे. यातील पहिली पायरी म्हणजे जिल्हा परिषद प्रशासनाचे सुनिश्चयन करणे, त्यामुळे इतर खात्यांशी क्षैतीज पातळीवर संपर्क साधता येईल. अशा (सक्षम) लघु पाटबंधारे खात्याने नवीन विहिरींचे खनन करुन त्या उर्जायुक्त केल्या पाहिजेत.

४.३.४ सेवायोजन: हा महत्त्वाचा भाग असून हंगामी बेकारीवर व स्थलांतराचे प्रमाण कमी करुन रोजगार हमी योजना कार्यान्वित केली पाहिजे. यासाठी ईजीएस खाते व ग्रामपंचायतीमध्ये चांगला समन्वय केला पाहिजे व ईजीएस खाते जे सद्या महसूल खात्याद्वारे हाताळले जाते ते परत होऊ नये. या बाबत ईजीएस हे एसजीआरवाय चे भाग होतील.

४.३.५ साक्षरता: पायाभूत सुविधांच्या कमतरतेमुळे शिक्षण घेण्यास अडथळा येतो. शिक्षकांची मोठ्या प्रमाणात आवश्यकता असून, शिक्षकांची गैरहजेरी, कमी दर्जाचे शिक्षण देणे व उपचारात्मक शिक्षण पद्धतीचा अभाव यांमुळे बरीच मुले शिक्षण घेण्यास कंटाळतात. प्रस्तुत प्रस्तावात यावर मात करण्यासाठी विविध उपाययोजना सांगितलेल्या आहेत. जसे ग्राम शिक्षण समिती (व्हीईसी) किंवा पालक-शिक्षक संघटना (पीटीए) हे शैक्षणिक कार्यक्रम उत्तमरित्या राबविण्यास सहाय्यक ठरु शकतात. निष्पादन मूल्य व शिक्षकांच्या गांव/युझर ग्रुप (सामुदायिक नियंत्रण) उत्तरदायित्वावर विचार करावयास हवा.

४.३.६ स्वयंरोजगार प्रशिक्षणासाठी वितरण प्रणाली: क्षमतांची निर्मिती करण्यास व त्यांचा प्रभावी वापर करण्याची संधी प्राप्त होण्यासाठी प्रशिक्षण महत्त्वाचे ठरते. काही शासकीय व खाजगी संस्था या जिल्हा व उपजिल्हा स्तरांवर असे प्रशिक्षण देतात (भूतकाळात देत होते.) या प्रशिक्षणाचे इतर कार्यक्रमांसोबत संलग्नीकरण करण्यात आलेले नाही. त्यामुळेच स्वयंरोजगाराच्या प्रशिक्षणातील संभावना वास्तविकरित्या ध्यानात आलेल्या नाहीत. या प्रशिक्षणाचे इतर सहाय्यक व्यवस्थांसोबत (तंत्रज्ञान, विपणन व पत) एकत्र प्रशिक्षण दिल्यास त्याचे भरपुर फायदे होतील व लाभधारकांस विविध सुविधा आणि पर्याय उपलब्ध होतील. या सर्व प्रशिक्षण संस्था, योजना व कार्यक्रम शासनाच्या एकाच

निर्देशनाखाली आणले पाहिजेत, तसेच जिल्हा पातळीवर या ब्युरोस स्वयंरोजगार व्यवसाय प्रशिक्षण शिक्षण असे नांव देण्यात यावे.

४.३.७ प्रभावी बालक पोषण: प्रस्तुत अहवालात बालकांच्या पोषक आहारावर पर्याप्त भर देण्यात आलेला असून, यात सकाळचे जेवण दुपारच्या जेवणासोबत द्यावे असे सुचविले आहे. तसेच आयसीडीएस यांच्या शाळेत वाटण्यात येणाऱ्या दुपारच्या जेवणाच्या सुविधेबरोबरच दोन संस्थांत सहयोग करण्याचे सुचविले आहे. याचा उद्देशपुर्तीसाठी आयसीडीएस केंद्रे शाळेजवळच असावीत व त्यांचे स्वयंपाकघर शाळेच्या स्वयंपाकघराशी संलग्न करण्यात यावे. संयुक्त कर्मचारीवृंद पुरवणी जेवणाचे शाळेच्या मुलांना वाटप करील व शाळा शिक्षकाची मुलांना जेवण वाटप करण्याच्या कामामधुन सुटका होईल. ही संपुर्ण कारवाई ब्लॉक विकास अधिकाऱ्यांच्या प्रशासनाखाली येईल (कार्यकारी अधिकाऱ्यांच्या संपुर्ण पर्यवेक्षणाखाली). तसेच आयसीडीएस चे सद्याचे मुख्य कार्य व शाळेतील अन्न/स्वयंपाकघर प्रभारी अधिकारी यांनी एक उपयुक्त करार करुन ते गावाच्या स्वयंसेवी महिलांना काही मानधनाच्या मोबदल्यात सदर काम देऊ शकतील.

४.४ सामाजिक कायद्याचे प्रभावि कार्यान्वयन: मानव विकासाचे लक्ष्य प्राप्त करण्यासाठी महत्त्वाच्या सामाजिक उद्देशांची पुर्तता होणे आवश्यक आहे. यासाठी काही कायदे करण्यात आलेला आहेत. परंतु त्यांची प्रभावी अंमलबजावणी होत नाही. या कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी झाली पाहिजे, जसे शारदा कायदा (बालविवाह विरोधी कायदा), जन्म व मृत्युची आवश्यक नोंदणी, गर्भधारणा व प्रसवाची नोंदणी इ. आतापर्यंत आलेल्या अनुभवावरुन असे दिसून येते की, समाज कल्याण खाते ज्याने हे कायदे राबविले पाहिजेत ते व पोलीस खाते प्रस्तुत कायदे प्रभाविपणे राबविण्यास अक्षम ठरले आहेत. हे कायदे राबविण्यासाठी समाजाचा वापर केल्यास, उदा. ग्राम पंचायत तर त्यांची अंमलबजावणी सक्षमतेने होऊ शकते. आवश्यकता वाटल्यास सदर कायद्यात त्या सुधारणा करण्यात याव्यात (उत्तरदायित्व सोपविण्यासाठी). ज्यामुळे ग्रामपंचायत व इतर ग्रामस्तरावरील इतर कार्यकारी आस्थापनांस उदा. ग्रामसेवक, सरपंच, पोलीस पाटील यांनी अशा कायद्यांतर्गत व्यवस्थित अभिलेख ठेवणे सक्तीचे होईल व त्यांचे अहवाल उच्च पातळीवरील अंमलबजावणी खात्यांना देण्यात येतील. या कायद्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा परिषदेच्या कार्यकारी शाखा व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना नियुक्त करुन त्यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात यावी.

४.५ पर्यवेक्षण व मुल्यांकन: सद्याची पर्यवेक्षण व मुल्यांकनाची पद्धत (एम व ई) ही प्रामुख्याने खर्च खात्यावर आधारीत आहे. म्हणजेच निव्वळ आवकच पाहिली जाते. या व्यवस्थेत शेवटी काय होतंय हे पाहिले जात नाही. या आवक लेखापरीक्षण व्यवस्थेस दूर करण्याची गरज असून, त्याजागी जावकाचे पर्यवेक्षण करणारी पद्धती अबलंबिली पाहिजे. पर्यायी व्यवस्था ही युझर फ्रेंडली, लोकाभीमूख व पारदर्शी असावी व तिच्यावर सामुदायिक नियंत्रण असावे व तिचे सामाजिक लेखा परिक्षण करण्यात यावे.

४.६ जिल्हा सांख्यिकी अधिकारी (डीएसओ) हे प्रस्तुत धोरणांत नियमित माहिती पुरवू शकतील. तसेच या कार्यालयाचे चांगल्या एकीकरणासाठी इतर विभागांशी संबंध तोडून सक्षमीकरण करणे आवश्यक आहे.

४.६.१ सर्व प्रमुख अस्थिर चलने गावासाठी उपलब्ध असावीत. विशेषतः निधीचे स्थान व प्राप्तीचा कार्यक्रम. याचे मुख्य कारण म्हणजे गावास त्यांच्या कृतीची परत माहिती व्हावी. तसेच कार्यकारी संस्था (म्हणजेच जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, मु.का.अ.) यांनी गावावर विशेष लक्ष देणे आवश्यक आहे व स्थानिक प्राधिकरणांनी चांगल्या धड्यांतून प्रेरणा घ्यावी. ग्राम स्तरावरील माहितीची आवश्यकता जाहीर करण्यात येऊ नये परंतु ती सीडीच्या स्वरुपाने देण्यात यावी.

४.६.२ ज्या क्षेत्रात अ.ज. समुदाय राहतो, त्याठिकाणी विशेष अभ्यास कार्यक्रम नियमितपणे राबविला जावा व त्यांच्या संपत्तीच्या प्रगतीचा आढावा घेण्यात यावा. हे कार्य एकतर नामांकीत संस्थेकडून करावे किंवा आदीवासी संशोधन संस्थेकडून करुन घेण्यात यावे. या अभ्यासां व्यतिरिक्त वरील पद्धतीने मुल्यांकन करण्यात यावे. पहिला अभ्यास आदीवासी जमिनीवरील फेरफार, विवादीत जमीन, सार्वजनिक प्रदर्शन, मुलींचे शिक्षण, बालकांची भेद्यता व इतर सामाजिक जागरुकता.

४.८ सुशासन व ई-गव्हर्नन्सः सर्वसमावेशक निधीची कमतरता ही वस्तुस्थिती असून, ती दोन्ही कार्यक्रम व क्षेत्रांमध्ये इसून त्यामुळे ३ प्रकारचे प्रश्न निर्माण झाले आहेत.

४.८.१ पहिला प्रश्न म्हणजे वेळेवर व सुनिश्चित निधीचा प्रवाह. असे निदर्शनास आले आहे की, जरी वर्षाच्या सुरवातीस निधीची तरतुद करण्यात आलेली असली, तरीही तो कार्यान्वयन एजन्सीपर्यंत प्रक्रियात्मक अडथळ्यांमुळे पोहचत नाहीत. ज्यामुळे अग्रीम नियोजन (कार्यान्वयनाची तयारी) व वास्तविक कार्यान्वयन यांना आर्थिक वर्षात निहित वेळेत अंमलबजावणी करता येत नाही.

४.८.२ यापुढील प्रश्न म्हणजे निधीचे त्याच्या अंतिम बिंदुपर्यंत खर्चासाठी पोहचण्यास लागणारी प्रक्रिया. उच्च पातळीवर एकापेक्षा अधिक प्राधिकरणे निधीचे नियंत्रण करतात. तसेच त्यांना हा निधी एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात हस्तांतरीत करण्याचा अधिकार असतो. तसेच निधीचे हस्तांतरण एकसारखे होतच असते, त्यामुळे जिल्हा एजन्सी योजनेच्या नियोजित काळाच्या पुर्णत्वाबाबत उदासीनता दाखवितात.

४.८.३ त्याचप्रमाणे आधी सांगितल्याप्रमाणे निधींचे सर्वसाधारणतः संचयन केले जाते. ज्यामुळे लागू असलेल्या योजनांवर निधी उपलब्ध आहे की नाही ह्याचे निर्देश मिळत नसल्याने योजनेच्या नियोजित काळाबाबत वाद-विवाद निर्माण होतात.

४.३.४ अंतिमतः योजना व कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची लवचिकता फारत कमी असल्याने प्रश्न निर्माण होतात. अशी भंगुरता शैक्षणिक, वैद्यकिय, आरोग्य, पोषण कार्यक्रमांबाबत

पहावयास मिळते (राज्य शासन पुरस्कृत) तसेच ईजीएस सारख्या पशु योजना (केंद्र सरकार पुरस्कृत) गरीबी गटाव योजना.

४.८.५ अंतिमतः प्रत्येक कार्यक्रमात काहीतरी लवचिकता काही परिस्थितीत व काही क्षणांपुरतीच असते. येथे देखील पंचायत पद्धतीची मदत घेता येते. तसेच स्थानिक सूक्ष्मतांवर जागरुकता येते.

४.६ विशेष अवधानः ए.ज. मुद्दाः आदीवासी विकास अनुक्रम (प्रकल्प अधिकारी, आदीवासी विभाग) व सर्वसाधारण प्रशासन व्यवस्थेमधील संबंध कसे आहेत ते अजुन स्पष्ट झालेले नाही. सैद्धांतिक स्वरुपात आदीवासी विकास प्रशासन एक स्वायत्त संस्था असली तरी त्यांची कार्य स्वायत्त नाही. यासाठी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व प्रकल्प अधिकारी (आदीवासी खाते) यांनी आपल्याती संबंध जाहिरपणे मांडावे असा प्रस्तावित करण्यात आले आहे. येथे मांडलेला प्रस्ताव उपरोल्लेखित प्रस्तावांच्या अनुषंगानेच मांडण्यात आला आहे. म्हणजेच यावर कोणातरी एकाचाच अधिकार असावा. त्यामुळे यावर प्रभारी अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी यांनीच काम पहावे.

# अनुमान

अहमदनगर परिदृष्य २०२० पत्र हे एकमेव पत्र हे देशांतील इतर राज्यांच्या पत्रांपेक्षा वेगळे आहे ज्यात सावधानिपुर्वक प्रश्नांची ओळक व उच्च पातळीवरील अर्थव्यवस्था, मानवाचा विकास व सामाजिक आणि सांस्कृतिक विकास यांचा उहापोह करण्यात आला आहे. याचे फलीत हे जिल्हास्तरीय कलेक्टरेट, जिल्हा नियोजन खाते व शासनाचे सभासद, राजकीय प्रतिनिधी, सार्वजनिक संस्था व शैक्षणिक संस्था यांचेकडून मिळालेली माहिती आहे. विविध क्षेत्रीय वार्तालाप, मात्रात्मक सर्वेक्षण, गुणवत्तापुर्ण चर्चा इ. मुळे साध्य झाले.

प्रस्तुत अहवालात विस्तृत निष्कर्ष काढण्यात आले आहेत. तसेच याच चालू पद्धतीमध्ये काही बदल व पर्याय सुचविलेले आहेत ज्यामुळे अधिक कार्यक्षमतांची लक्ष्यपुर्ती होईल. या अहवालाचा मूळ पाया हा शासकीय पातळीवरील नोकरशाहीच्या कार्यवाहीबाबतच्या अडचणी ही एक बाजू असून दुसऱ्या बाजुस ग्रामीण समाजात जातीव्यवस्थेचे खोलवर रुजलेले मूळ हे आहे. तरीही शासकीय पातळीवरील विविध क्षेत्रांत समन्वय साधला गेला तर सद्याची शासन प्रणाली चांगले उत्पादन देऊ शकेल. उदा. जर का शासनाच्या शैक्षणिक व गरीबी कार्यक्रम राबविणाऱ्या खात्यांनी समन्वय केला तर पंचायत राज संस्थेत शासन आपली मशीनरी त्यांच्या पदांनुसार राबवुन एकत्र कार्य करु शकेल व जर सक्षम पर्यवेक्षण व मुल्यांकन यंत्रणा असतील व त्यांचे नियमित प्रतिक्रिया येत राहतील तर कार्यक्रमांमध्ये सातत्याने सुधारणा होत राहतील व कार्यक्रम राबविल्यावर चांगली फलनिष्पत्ती होईल.

यासाठी वेगवेगळे प्रस्ताव खालील प्रमाणे मांडण्यात आले आहेत:

- नवीन भूजल धोरण अंमलात आणावे, जेणेकरुन भूगर्भात वाहुन जाणाऱ्या पाण्याचा पुनर्वापर संभव होईल. तसेच एकत्रित ओलीताखालील जमिनींचा विकास- जो नाबार्ड/ इंडो जर्मन मॉडेलवर आधारीत आहे- त्याची पेयजल योजनेबरोबर सहयोगिता करावी. सर्व ओलीताखालील जमिनींच्या योजनांवर अंमलबजावणीचे अधिकार फक्त एकाच प्राधिकरणाकडे सोपवावेत.
- पाटबंधारे व पिण्याचे पाण्याच्या गरजा पुर्ण करण्यासाठी विहिरी पर्याप्त खोलीपर्यंत खणाव्यात. तसेच इस्टतम कृषि पॅटर्न, बाजाराचे प्रभावी कार्य, जल बचाव उपकरणे जसे खोल पाटबंधारे व एकत्रित किटक व्यवस्थापन यांस प्राधान्य देण्यात यावे.
- तिसरे म्हणजे अकृषिक कार्यास प्राधान्यक्रम देण्यात यावा व स्थानिक स्त्रोत/ कुशल प्रशिक्षण, पत देण्यामुळे कृषिक्षेत्रा व्यतिरिक्त इतर रोजगार उत्पन्न होतील. अंतिमतः ग्रामीण पत योजनेचे सक्षमीकरण भांडवलीकरणाद्वारे करुन सद्याच्या नष्ट होत चाललेल्या आर्थिक संघठन पद्धतीस सक्षम करण्यात यावे, तसेच पतधोरण स्वस्त करुन कृषिक व अकृषिक अशा दोन्ही क्षेत्रांत लघु उत्पादकांना अर्थपुरवठा उपलब्ध करावा.
- सद्याच्या भौतिक क्षमतांना वाढविणे व दुरुस्त करणे आवश्यक आहे (शाळा, रुग्णालये, दवाखाने). त्याचबरोबर शिक्षकांसाठी घरे, रिकामी पदे भरणे (शिक्षक व आरोग्य अधिकारी), शिक्षकांची क्षमता वाढविणे व त्यांना आवश्यक ते प्रशिक्षण देऊन त्यांना प्रशिक्षित व्यक्ती बनविणे औषधांचे वितरण, औपचारीक शिक्षण, प्राथमिक शाळांत सकाळचे जेवण,

आयसीडीएसची क्षमता वाढविणए व त्यांना अन्न सुरक्षा कार्यक्रमात नवी दिशा देणे असे काही प्रस्ताव आहेत.

- भौतिक पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणुक, श्रमशक्तीचे नियोजन व ग्रामीण आणि शहरी क्षेत्रांत नियोजन व संपर्क हे प्रस्तुत दस्तऐवजामधील मुख्य आव्हाने आहेत.

सर्व दृष्टिकोन तीन स्तंभांवर आधारीत आहे:

१. बहुतेक कार्यक्रमांत मानव विकासावर भर देण्यात आला आहे व पंचायत राज पद्धतीबरोबरच एनजीओ भागीदारीची कल्पना करण्यात आलेली आहे. हा दृष्टिकोन वास्तविक असून विकेंद्रीकरणाच्या कार्यास हातभार लावेल. तसेच सध्याच्या फाजील कुपमंडूक कार्यांवर व प्राधिकरणांवर लगाम घालून कार्यक्रमाचे अंतिम लक्ष्य साध्य करण्यास सहकार्य करेल.

२. प्रत्येक कार्यासाठी निकट पर्यवेक्षण व प्रतिक्रियांची जरुरी असून प्रतिक्रिया संबंधित कार्यक्रमामध्ये सतत नोंदवावी जेणेकरुन कार्यक्रमाची सतत सुधारणा करता येईल.

३. निधीची उपलब्धता व प्रवाहता पर्याप्तपणे चालु राहिली पाहिजे. काही प्रकरणांत ती रद्द होणारी नसावी यासाठी नवीन एजन्सी- जिल्हा मानव विकास मिशन यांची जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत स्थापना करावी. जिल्हा परिषदेत डीपीसी-डीपीओ तयार करुन तिला सक्षम करावे व निधींचा विनियोग करण्यास मदत करावी.

या अहवालात देण्यात आलेले प्रस्ताव सतर्कतेने दिले आहेत व नवीन कार्यक्रम मार्गदर्शक तत्त्वावर परीक्षित करावा. तसेच शक्य असल्यास युझर शुल्क प्रत्येक सामान/सेवेवर आकारण्यात यावे व पुढे जेव्हा खाजगी क्षेत्रात भागीदारी करण्याच प्रसंग येईल तेव्हा त्यांची मागणी करण्यात यावी. बजेटमधील वार्षिक वाढ १०-१२ टक्क्यांपेक्षा जास्त नसावी व ते बजेट कार्यक्रमाचे वास्तविक निधी संकलानुसार ठरवावे.

This document was created with Win2PDF available at http://www.win2pdf.com.
The unregistered version of Win2PDF is for evaluation or non-commercial use only.
This page will not be added after purchasing Win2PDF.